


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३१० ■ बुधवार, दि.२० मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# घरमालकाने पीडीएफ दाखविल्याने नीट पेपरफूटचा भंडाफोड!

## शशिकांत सुथारांनी सांगितला घटनाक्रम

प्रतिनिधी २० मे




**नवी दिल्ली :** नीट पेपरफुटीप्रकरण समोर आणणारा राजस्थानातील शिक्षक शशिकांत सुथार यांनी आता समोर येऊन सर्व घटनाक्रम सांगितला आहे. पेपरफुटी लक्षात कशी आली त्याची माहिती त्यांनी दिली. ३ मे या दिवशी पेपर संपल्यावर सुथार यांनी संपूर्ण प्रश्नपत्रिका चाळली, त्याचवेळी त्यांच्या घरमालकाने त्यांना रसायनशास्त्राची एक पीडीएफ दाखवली, त्यातील प्रश्न आणि प्रश्नपत्रिकेतील ४५ प्रश्न समान असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. असाच प्रकार काहीवेळाने जीवशास्त्राच्या पेपरबाबतही झाल्याचं दिसलं, असं शशिकांत सुथार म्हणाले.

जीवशास्त्राच्या ९० प्रश्न समान असल्याचं आढळलं. त्यानंतर शशिकांत सुथार यांनी यंत्रणांना ही माहिती दिली. एनटीए, सीबीआय, शिक्षण मंत्रालय यांना मेलद्वारे ही माहिती दिली असं शशिकांत सुथार यांनी म्हटलंय. सरकारकडून लगेच प्रतिसाद देऊन कारवाई सुरु केली, अशी माहितीही शशिकांत सुथार यांनी दिली.

नीट पेपरफुटीप्रकरणी मनीषा मांढरेला १४ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावण्यात आली आहे. याचदरम्यान, मनीषा मांढरेबाबत एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. नीटच्या पेपर फुटीचा कट शिवराज मोटेगावकरने त्याच्या साथीदारांना हाताशी धरुन अतिशय सुनियोजितपणे आखल्याचं सीबीआयच्या तपासात समोर येत आहे. पीव्ही कुलकर्णीने केमिस्ट्रीच्या तर मनीषा मांढरेने बायोलॉजीच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न तोंडपाठ केले त्यानंतर ते हाताने लिहून काढून मोटेगावकरला पाठवले. मोटेगावकरने ते पीडीएफच्या स्वरुपात स्वत:च्या मोबाईलमधे सेव्ह करुन ठेवले आणि पुढे पैशांच्या बदल्यात त्यांची विक्री केली.

### यूजी-नीट पेपरफुटीचे नागपूर कनेक्शन!

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या 'नीट-यूजी २०२६' पेपरफुटी' घोटाळयात आता नागपूर कनेक्शन समोर आले आहे. या रॅकेटचा नांदेड पॅटर्न तपासताना सीबीआयच्या 'रडार'वर आता नागपूर येथील आलोक नावाचा संशयित मास्टरमाईंड आला आहे. या आलोकनेच किमान एक हजार विद्यार्थ्यांना नीटचा पेपर विकल्याचा दाट संशय केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाला आहे, अशी माहिती सीबीआयच्या सूत्रांनी दिली आहे.

### कोचिंगचा गोरखधंदा, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ

आयआयटी आणि नीटच्या नावाखाली गल्लोगल्ली सुरू असलेल्या या कोचिंगच्या गोरखधंद्यात, पालकांची आर्थिक लूट होते आहे. १०० टक्के यशाची हमी देणारे ट्युशन क्लासेस गल्लोगल्ली पाहायला मिळतात. दुसरीकडे विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात नावापुरता प्रवेश असतो. त्यामुळे क्लास आणि कॉलेजच्या अभद्र युतीमुळे विद्यार्थ्यांना कॉलेजला जाण्याचीही गरज भासत नाही. त्यामुळे स्वप्नांचा पाठलाग करताना मुलांसह पालकांनाही कोचिंगच्या भरवशावर राहावं लागतयं.

### १०० टक्के यशाची हमी देऊन विद्यार्थी-पालकांची दिशाभूल

पुणे, मुंबई, कोटा आणि नागपूरसह आता छोट्या शहरांत कोचिंगचं जाळं पसरलयं. नीटच्या १ लाख जागांसाठी २२ लाख विद्यार्थी स्पर्धेत असून ९० टक्के विद्यार्थी कोचिंगवर अवलंबून असतात. आयआयटी-नीटच्या मर्यादित जागांमुळे पालक मोठ्या फीच्या आमिषाला बळी पडत असल्याचं पाहायला मिळतं.. तसचं नामांकित क्लासेस १०० टक्के प्रवेशाची हमी देऊन २ ते ३ लाख रुपये फी आकारतात.

### विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा, अपेक्षांचा मांडला बाजार

निकालाच्या दबावामुळे काही संचालक पेपरफुटीसारख्या गैरमार्गांचा अवलंब करतात, त्यात ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी राहण्याची आणि शिक्षणाची एकाच ठिकाणी सोय उपलब्ध केली जाते. त्यामुळे अवाढव्या फी आकारणं शक्य होतं. मात्र लाखो रुपये खर्चूनही जेईईध्ये ७७ टक्के विद्यार्थ्यांना ५० टक्केपेक्षा कमी गुण मिळतात. तर नीटच्या परीक्षेत ८८ हजार जागांसाठी पात्र ठरणाऱ्यांचं प्रमाण केवळ ५ टक्के आहे.

# राज्यातील महामंडळाचे महिन्याभरात वाटप!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला पुढाकार




प्रतिनिधी २० मे

**मुंबई :** राज्यातील महायुती सरकारकडून लवकरच बहुप्रतिक्षीत महामंडळ वाटपाची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. महायुती सरकार सत्तेत आल्यापासून महायुतीमधील अनेक नेते आणि पदाधिकारी हे महामंडळांच्या वाटपाकडे डोळे लावून बसले आहेत. अखेर महामंडळांचे वाटप करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: पुढाकार घेतला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी भाजप आणि मित्रपक्षांच्या नेत्यांना महामंडळांचे जागा वाटप लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे सध्या महायुतीचे नेते आणि पदाधिकारी यांच्यात आनंदाचे वातावरण आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, येत्या महिनाभरात राज्यातील महामंडळाचे जागावाटप पूर्ण होईल. महामंडळ वाटपाचा महायुतीचा फॉर्म्युला ठरला आहे. त्यानुसार, भाजपा ४८ टक्के, शिवसेना २९ टक्के आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसला २० टक्के महामंडळ, असे सूत्र निश्चित करण्यात आले आहे. मात्र, कोणत्या पक्षाला कोणते महामंडळ मिळणार, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. येत्या महिनाभरात यावर शिक्कामोर्तब होईल. महायुतीच्या पुढील बैठकीत महामंडळातील सदस्य वाटप होईल, असे सांगितले जात आहे. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत महामंडळ वाटपाच्या यादीवर अंतिम शिक्कामोर्तब होईल. यानंतर तिन्ही पक्षांचे नेते कोणत्या महामंडळावर कोणाची वर्णी लावायची हा निर्णय घेतील.

**महामंडळावर वर्णी लागण्यासाठी नेते, कार्यकर्त्यांची मोर्चेबांधणी**

सध्या राज्यात विधानपरिषद निवडणुकीसंदर्भात राजकीय हालचाली सुरु आहेत. विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या १६ जागांवर निवडणूक होणार आहे. १८ जून रोजी मतदान तर २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. एकूण १७ जागांवर निवडणूक होणार, ज्यातील एका ठिकाणी पोटनिवडणूक होणार आहे. त्यानंतर महामंडळ वाटपाच्या प्रक्रियेला गती येण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी महायुतीचे नेते आणि कार्यकर्त्यांकडून आतापासून महामंडळांवर आपली वर्णी लावून घेण्यासाठी मोर्चेबांधणी सुरु होईल. त्यामुळे पुढील काही दिवसांमध्ये या राजकीय घडामोडींकडे पाहणे औत्स्युकाचे ठरेल.

# ऑनलाइन औषध विक्री विरोधात आज देशव्यापी मेडिकल बंद...!

प्रतिनिधी २० मे




**अकोला:** ऑनलाइन आणि इंटरनेट द्वारे वाढत चाललेल्या औषध विक्रीच्या विरोधात ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट च्या वतीने आज बुधवार २० मे रोजी देशव्यापी बंदचे आवाहन करण्यात आले होते त्यामुळे आज शहरातील तसेच जिल्ह्यातील जवळपास अडीच हजाराहून अधिक मेडिकल दुकाने बंद ठेवण्यात आली होती मात्र रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी काही निवडक मेडिकल स्टोअर्स सुरू ठेवण्यात आले होते. दरम्यान औषध विक्रेत्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी सकाळी दहा वाजता जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेत्यांनी दवा बाजार येथे एकत्र येऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढला. जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा आल्यानंतर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.

### अन्न व औषध प्रशासनाने केली नियंत्रण कक्षाची स्थापना

औषध पुरवठा खंडित होऊ नये यासाठी अन्न व औषध प्रशासनाने विशेष तयारी केली होती नियंत्रण कक्षा द्वारे जिल्हाधिकारी पोलीस विभाग सिविल सर्जन जिल्हा आरोग्य अधिकारी इंडियन मेडिकल असोसिएशन तसेच खाजगी व निमशासकीय रुग्णालयांशी समन्वय ठेवण्यात आला

### बंद बेकायदेशीर असल्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

औषध आणि जीवनावश्यक वैद्यकीय सेवा ही मानवी जीवनाचा मूलभूत अधिकार असून ती अत्यावश्यक सेवा अंतर्गत मोडतात. ऑनलाइनला विरोध करण्याच्या नावाखाली संपूर्ण जिल्ह्यातील औषध दुकाने बंद ठेवणे हा नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा क्रूर प्रकार आहे त्यामुळे संपकर्त्यांवर अत्यावश्यक सेवा कायद्याचे उल्लंघन व फौजदारी गुन्हा दाखल करावा, असोसिएशनच्या वैधतेची व नोंदणीची सखोल चौकशी करावी, औषध परवाने तात्काळ जप्त व रद्द करावे, विना फार्मसीस्ट आणि बोगस फार्मसी दुकानांची चौकशी करावी, आदी मागण्यांबाबत शेखर पूर्णये नामक व्यक्तीने जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली

# अकोला-शेगाव रस्त्यावर ट्रॅव्हल्स आणि दुचाकीचा अपघात

## अपघातानंतर ट्रॅव्हल्सने घेतला पेट; आगीत पूर्ण ट्रॅव्हल्स जळून खाक

प्रतिनिधी २० मे



**अकोला :** जिल्ह्यातील बाळापूर-शेगाव रस्त्यावरील 'स्वस्तिक ट्रॅंव्हलस' ची बस ही इंदौर वरुन अकोला कडे येत होती. या बस खाली टुव्हीलर येऊन बसचे टायर फुटले.. आणि टुव्हीलर बस खाली फरफटत गेल्याने ट्रॅव्हल्सने पेट घेतला. व पाहता पाहता बस जळून खाक झाली..

आज झालेल्या या अपघातात कोणतीही जीवीतहानी झाली नाही. ट्रॅव्हल्स मधील सर्व प्रवासी सुखरूप आहेत.. मात्र, दुचाकीचा चालक हा गंभीर जखमी झाला आहे. घटनेची माहिती मिळताच बाळापूर येथील नगर परिषदेच्या अग्निशमन दलास घटनास्थळी पाचारण करण्यात आले. ट्रॅव्हल्सला भीषण आग लागली होती, बघता बघता संपूर्ण बस या अपघात पूर्णतः जळून खाक झाली. यावेळी घटनास्थळावर नागरीकांनी मोठी गर्दी केली होती.

# ठाकरेंचे तीन खासदार शिंदे गटाच्या संपर्कात?

प्रतिनिधी २० मे


**मुंबई :** गेल्या काही काळापासून राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ पहायला मिळत आहे. अनेक नेत्यांनी पक्षांतर केलेले आहे. त्यानंतर झालेल्या निवडणुकीतही अनेक बड्या नेत्यांनी पक्षांतर केले होते. त्यावेळी एकनाथ शिंदे यांनी ऑपरेशन टायगर राबवले होते, अशी चर्चा होती. अशातच आता पुन्हा एकदा ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू झाली आहे.ऑपरेशन टायगरच्या चर्चांना सर्वात जास्त उधाण तेव्हा आलं जेव्हा ठाकरेंचे एक-दोन नव्हे तर तीन खासदार शिंदेसेनेतील नेत्यांना भेटले. सर्वप्रथम नागेश आष्टीकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या पाठोपाठच वाघचौरे यांनी मंत्री उदय सामंत यांची भेट घेतली.




# अकोला बनतोय तप्त भट्टी..!

## कर्कवृत्तामुळे सूर्य थेट डोक्यावर, काळी माती वातावरणात सोडते उष्णता

प्रतिनिधी २० मे




**अकोला :** अकोल्याच्या तापमानाची जागतिक पातळीवर नोंद करण्यात आली आहे. यावर्षी तर ४७ अंशांच्यावर तापमानाचा पारा गेला असून, ४५ ते ४६ अंश सेल्सियस हे अकोल्याचे उन्हाळ्यात कॉमन तापमान झाले आहे.

नेमके एवढे तापमान अकोल्यातच का, असा प्रश्न अकोलेकरांना पडणे सहाजिकच आहे. तज्ज्ञांद्वारे याचे कारण देताना अकोल्यातून कर्कवृत्त गेल्यामुळे सूर्य डोक्यावरच राहत असल्याने तापमान अधिक राहते. तसेच अकोला जिल्ह्यात बहुतांश जमीन ही काळी कसदार असल्याने तीन उष्णता साठवून ठेवून वातावरणात सोडत असते. यामुळे अकोला एखाद्या तप्त भट्टीसारखे उन्हाळ्यामध्ये तापत राहते.

शहर तापण्यामागे तसेच उन्हाळ्यात ४५ ते ४७ अंश तापमान जाण्यामागे अनेक भौगोलिक, खगोलशास्त्रीय आणि मानवनिर्मित शास्त्रीय कारणे आहेत. त्यामुळे या भागात तप्त भट्टी का होते, याचा उलगडा होतो. मुख्य म्हणजे कर्कवृत्ताची स्थिती. पृथ्वीवरील कर्कवृत्त हे अकोल्याच्या अगदी उत्तरेकडून जाते. यामुळे उन्हाळ्यात सूर्य थेट डोक्यावर येतो आणि सूर्याची किरणे कोणतीही ऊर्जा न गमावता सरळ भूपृष्ठावर पडतात, ज्यामुळे तीव्र उष्णता निर्माण होते. तसेच अकोला शहर अरबी समुद्र व बंगालचा उपसागरापासून बरेच लांब अंतरावर आहे. त्यामुळे समुद्राच्या थंड वाऱ्यांचा कोणताही प्रभाव शहरावर पडत नाही. हवा अतिशय कोरडी असते. विदर्भ आणि अकोला परिसराची जमीन ही मुख्यत्वे काळ्या दख्खनच्या लाव्हा खडकापासून बनलेली आहे. ही काळी माती उष्णता शोषून घेण्याची क्षमता जास्त ठेवते आणि ती उष्णता दिवसभर साठवून हळूहळू वातावरणात सोडते. उत्तर भारतातून आणि राजस्थानातून येणारे अतिशय उष्ण आणि कोरडे वारे ('लू') अकोल्याच्या दिशेने वाहतात, ज्यामुळे हवेचे तापमान अचानक वाढते. उन्हाळ्याच्या दिवसांत अकोला विभागात आकाश बऱ्याचदा निरभ्र असते. कोणत्याही ढगांचे आच्छादन नसल्याने सूर्यप्रकाशाचा थेट मारा जमिनीवर होतो.

### सिमेंट रस्त्यांमुळे तापमानाला हातभार!

वाढत्या सिमेंटच्या जंगलांमुळे उष्णता शोषली जाते आणि तीच उष्णता रात्रीच्या वेळी बाहेर पडल्यामुळे तापमान कमी होत नाही. शहराच्या आजूबाजूला सर्वच रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात चौपदरीकरण झाल्याने त्यामध्ये अनेक मोठ-मोठी झाडे भुईसपाट झाली. तसेच आजूबाजूला वाढत्या जंगलतोडीमुळे नैसर्गिकरित्या तापमान नियंत्रित ठेवणारी झाडे कमी झाली आहेत. हवेतील आर्द्रता कमी झाल्यामुळे कोरडी उष्णता अधिक जाणवते.

CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
बुधवार, दि. २० मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## शेतकऱ्यांना वेठीस धरणे थांबवा

**अकोला.** ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना वेठीस धरले जाते. लिंकिंग द्वारे खते खरेदी करण्यासाठी दबाव आणला जातो. तसेच बनावट बियाणे देखील या काळात मोठ्या प्रमाणात बाजारात येतात. अशा प्रकारे शेतकऱ्यांची परीक्षा पाहिली जाते. खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असतो. संपूर्ण वर्षाचे नियोजन केले जाते. मात्र यावेळी अनंत अडचणी शेतकऱ्यांच्या समोर उभ्या राहिलेल्या असतात. प्रत्येक हंगामात सारखा अनुभव येतो त्यामुळे शेतकरी वैतागतात. ही अडचण दूर व्हावी अशी अपेक्षा असते.

# वाढते तापमान आणि पृथ्वीसमोरील संकट

देशात दिवसेंदिवस तापमान वाढत असून संपूर्ण जग एका गंभीर पर्यावरणीय संकटाच्या उंबरठ्यावर उभे आहे. वाढत्या तापमानामागील कारणे कोणती आहेत, ती का निर्माण होत आहेत आणि त्यावर उपाय काय असू शकतात याचा गंभीरपणे विचार करणे आज अत्यंत गरजेचे झाले आहे.

संपूर्ण देशभर मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करून महामार्ग, द्रुतगती मार्ग आणि विविध विकासकामे केली जात आहेत. विकास आवश्यक असला तरी त्याच प्रमाणात वृक्षारोपण होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणावर झाडे लावून त्यांचे संवर्धन करणे गरजेचे होते; मात्र प्रत्यक्षात तसे होताना फारसे दिसत नाही.

आज शहरांमध्ये काँक्रीटचे जंगल उभे राहत आहे. मोठमोठ्या इमारती, उद्योग, व्यवसाय आणि कारखाने वाढत असल्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. उद्योगधंद्यांतून आणि वाहनांतून बाहेर पडणारे धूर व प्रदूषित वायू तापमान वाढीस कारणीभूत ठरत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून जलसंवर्धन, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचे विविध कार्यक्रम राबविले जात आहेत; परंतु प्रत्यक्ष कृती मात्र कमी प्रमाणात दिसून येते. पूर्वी 'प्रत्येकाने एक झाड लावावे' असा संदेश दिला जात होता; परंतु आजची परिस्थिती पाहता 'प्रत्येकाने एक छोटे जंगल निर्माण करावे' अशी वेळ आली आहे. तरच पृथ्वीचे संवर्धन आणि संरक्षण शक्य होईल.

प्रदूषण वाढविणारी विविध साधनेही तापमान वाढीस कारणीभूत ठरत आहेत. महामार्गांवर दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत आहे. दुचाकी, तीनचाकी, चारचाकी तसेच जड वाहनांमुळे वायूप्रदूषण वाढत असून त्याचा थेट परिणाम हवामान बदलावर होत आहे. तापमान वाढीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. शक्य तिथे वाहनांचा वापर कमी करून सायकलचा वापर वाढवावा. त्यामुळे आरोग्य चांगले राहील आणि पर्यावरणाचेही संरक्षण होईल. वाढत्या प्रदूषणामुळे ओझोन थरावर परिणाम होत असून सूर्याची तीव्र किरणे थेट पृथ्वीवर पडत आहेत. हे देखील तापमान वाढीचे एक महत्त्वाचे कारण आहे.



आज पृथ्वी गंभीर संकटाचा सामना करत आहे आणि या परिस्थितीस मोठ्या प्रमाणावर मानवच जबाबदार आहे. पृथ्वीचे संरक्षण करण्यासाठी प्रत्येकाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे, वृक्षारोपण करणे, पाणी वाचवणे आणि प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे.

कुणा एखाद्यावर अवलंबून न राहता आपण स्वतःच पुढे येऊन या कामाला सुरुवात करायला हवी. मग प्रश्न पडतो की मी एकटा काय करू शकतो, यासाठी मी आपल्याला एक कथा सांगतो की, 'एका जंगलामध्ये आग लागून वनवा पेटला होता अशावेळी जंगलातील सर्व प्राणी पक्षी आपले प्राण वाचवण्यासाठी जंगलाबाहेर पळत सुटली होती. जंगलाचा राजा सुद्धा आगीच्या विरुद्ध दिशेने धावत सुटला होता. परंतु याच दरम्यान एक छोटा पक्षी हा आगीच्या दिशेने जातांना दिसुन आला. यावर जंगलाच्या राजाने पक्षाला विचारले की तू आगीच्या दिशेने का जात आहेस, यावर त्या छोट्या पक्षाने उत्तर दिले की मी आग विजविण्यासाठी जात आहे. यावर जंगलाचा राजा हा त्या छोट्या पक्षाकडे पाहून मोठ्याने हसला, आणि म्हणाला की तुझ्या चोचीमध्ये पाण्याचा एक थेंब आहे त्यामुळे जंगलाचा एवढा वनवा विजू शकत नाही. यावर प्रतिक्रिया देताना छोट्या पक्षाने जंगलाच्या राजाला सांगितले की मला माहित आहे की माझ्या चोचीमध्ये फक्त पाण्याचा एक थेंब आहे त्यामुळे आग विजु शकत नाही परंतु मी माझे कर्तव्य करीत आहे, ज्या जंगलाने मला लहानाचे मोठे केले खाण्याला अन्न दिले त्याचं संरक्षण करण्याची माझी जबाबदारी आहे आणि ही जबाबदारी प्रत्येकाला कळली तर जंगलातील सर्व हजारो प्राणी येऊन ही जंगलाची आग विजवु शकतात.'

म्हणून वेळ अजून गेलेली नाही, आपण सर्वांनी एकत्र येऊन पर्यावरण संरक्षणासाठी ठोस पावले उचलली तरच भावी पिढ्यांना सुरक्षित आणि सुंदर पृथ्वी देणे शक्य होईल. 'पृथ्वी वाचली तरच भविष्य वाचेल.'

प्रा. प्रज्ञानंद थोरात
मो. ९८२२६७४४८७

## सामाजिक वनीकरण विभागाचा लोकसहभागावर भर

सामाजिक वनीकरण विभाग हा लोकसहभागातून वनीकरणाला प्रोत्साहन देणारा आणि ग्रामीण व शहरी भागात पर्यावरणाचे संतुलन राखणारा अत्यंत महत्त्वपूर्ण विभाग आहे? या विभागाचे नियोजन आणि कार्यपद्धती प्रामुख्याने वृक्षारोपण, संवर्धन, आणि शाश्वत विकासावर केंद्रित असते?

सामाजिक वनीकरण विभागाचे सविस्तर नियोजन खालील प्रमुख मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते:

सामाजिक वनीकरणाची उद्दिष्टे - स्थानिक गरजांची पूर्तता: इंधन, लाकूड, लहान लाकूड आणि चाऱ्याची वाढती मागणी पूर्ण करणे?

पारंपारिक वनावरील ताण कमी करणे: जंगलातील लाकूडतोड व जनावरांच्या चराईवर नियंत्रण मिळवणे. पडीक, खारपाणपट्टे आणि पडीक शासकीय जमिनींचा लागवडीखाली विकास करणे?

पर्यावरण संवर्धन: जमिनीची धूप थांबवणे आणि स्थानिक हवामान अनुकूल बनवणे?

नियोजनाचे प्रमुख घटक - शहरी वनीकरण शहरांमधील मोकळ्या जागा, उद्याने, रस्त्यांचे दुभाजक येथे वृक्षारोपण करून सुशोभीकरण करणे?

ग्रामीण व ग्रामीण रस्ते वनीकरण: गावातील सामायिक जागा, पांदन रस्ते, कालवे, रेल्वेमार्ग आणि रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपण करणे?

शेत वनीकरण - शेतकऱ्यांना त्यांच्या शेताच्या बांधावर किंवा पडीक शेतजमिनीवर व्यावसायिक व फळझाडे लावण्यास प्रोत्साहित करणे?

अंमलबजावणी व व्यवस्थापन -

लोकसहभाग व संयुक्त वन व्यवस्थापन: स्थानिक ग्रामपंचायती, महिला बचत गट, आणि स्थानिक लोकांच्या मदतीने नियोजनाची अंमलबजावणी करणे?

रोपवाटिका निर्मिती: विविध स्थानिक आणि उपयुक्त प्रजातींच्या रोपांची निर्मिती करून ती माफक दरात किंवा मोफत नागरिकांना व शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे?

शासकीय योजनांची सांगड: महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सारख्या योजनांचा मेळ घालून बांधावर वृक्ष लागवड करणे?

प्रमुख योजना व उपक्रम - कन्या वनसमृद्धी योजना, मुलींचा जन्म व वनसंवर्धन या दोन्ही गोष्टींना प्रोत्साहन देणारी योजना?

छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार - उत्कृष्ट वृक्षलागवड व संवर्धन करणाऱ्या संस्था, ग्रामपंचायती आणि व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविणे?

चला जाणूया वनाला' सारख्या उपक्रमांतून शालेय विद्यार्थ्यांना वनांचा अभ्यास आणि निसर्गानुभव देण्याचे नियोजन केले जाते? सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकृत योजना आणि महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांसाठी आपण महाराष्ट्र वन विभाग किंवा जिल्हा परिषद अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊ शकता?

## उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी मुर्तिजापूर यांचे कार्यालय, मुर्तिजापूर

ई-मेल: sdomurtizapur@gmail.com　　दुरध्वनी: ०७२५६-२४३४७२

क्रमांक :उविआ/मुर्तिजापूर/आ.क्र./प्रस्तु- १/कावि- ४८९ /२०२६　　दिनांक :१४/०५/२०२६

### जाहीर लिलाव

**स्थळ :-** शासकीय धान्य नविन गोडावून क्र. ०६, उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे मागे ता. मुर्तिजापुर जि. अकोला
**लिलाव दिनांक :-** दिनांक २८.०५.२०२६ गुरुवार वेळ - सकाळी ११.०० वा.

सर्वत्र लोकांना याद्वारे कळविण्यात येते की, लक्ष्मीबाई देशमुख सामान्य रुग्णालय, मुर्तिजापुर ता. मुर्तिजापुर जि. अकोला यांचे नावे ( गांव नमूना ७/१२ नुसार) असलेल्या खालील दर्शविल्याप्रमाणे मौजे सिरसो भाग-१, सिरसो भाग-२, मौजे दताळा ता. मुर्तिजापुर व मौजे कुरणखेड ता. अकोला जि. अकोला येथील शेत जमीनीचे माहे ३१ में २०२७ पर्यंत फक्त वहिती करण्याकरिता जाहीर लिलाव आयोजित करण्यात येत आहे.

सदरहू लिलाव हा गुरुवार दिनांक २८.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता पासून शासकीय धान्य नविन गोडावून क्र. ०६, उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे मागे ता. मुर्तिजापुर जि. अकोला येथे आयोजित करण्यात आलेला आहे. तरी इच्छुक व्यक्तींनी लिलावासाठी शासकीय धान्य नविन गोडावून क्र. ०६, उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे मागे ता. मुर्तिजापुर जि. अकोला येथे वर नमूद दिनांकास उपस्थित राहावे.

### लिलाव करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन

| अ. क्र. | गावाचे नाव | शेत गट क्र. सर्व्हे क्र | एकुण क्षेत्र हे. आर | क्षेत्र (एकर गुंठे मध्ये) | हिस्सा | लिलावा करीता निर्धारित करण्यात आलेली प्रती एकर रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | सिरसो भाग-१ | १४ | ५.१० | १२.७५ | पूर्ण | १०००० | लिलावाची मुदत माहे मे २०२७ पर्यंत अंमलात राहील. |
| २ | सिरसो भाग-१ | २० | ८.५६ | २१.४० | पूर्ण | १०००० | |
| ३ | सिरसो भाग-१ | ७०/३ | २.७८ | ६.९५ | पूर्ण | १०००० | |
| ४ | सिरसो भाग-१ | ७७ | ४.९७ | १२.४२ | पूर्ण | १०००० | |
| ५ | सिरसो भाग-१ | ११२/३ | ०.५५ | १.३७ | पूर्ण | १०००० | |
| ६ | सिरसो भाग-२ | २८८ | ०.०९ | ०.२२ | पूर्ण | १०००० | |
| ७ | सिरसो भाग-२ | २९५ | २७८-पो.ख.०.०७ एकुण २.९४ | ७.१७ | पूर्ण | १०००० | |
| ८ | सिरसो भाग-२ | ३३८ | ७.८८ | १९.७० | पूर्ण | १०००० | |
| ९ | सिरसो भाग-१ | १३०/३ | १.६२ | ४.०० | पूर्ण | १०००० | |
| १० | दाताळा | ४४५ | १५.४३ | ३८.५० | पूर्ण | १०००० | |
| ११ | कुरणखेड | ५४ | २.४३ | ०.०० | पूर्ण | १०००० | |

**टिप :-** मौजे दताळा येथील शे.स.नं. ४४५ मधील एकूण क्षेत्र हे १५.४३ हे. आर (३८.५ एकर) असल्यामुळे सदर क्षेत्रफळाचे १० एकरचे तीन व उर्वरित ८.५ एकर चा एक असे चार भागात विभाजन करुन हर्रासी करण्यात येईल. दहा एकर क्षेत्रासाठी बोलीची किमान निर्धारित रक्कम रु १०००००/- प्रती भाग व ८.५ एकर भागासाठी बोलीची किमान निर्धारित रक्कम रु ८५०००/- राहील.

**अटी व शर्ती-**

१. प्रस्तावित जमीनीचा लिलाव माहे ३१ मे २०२७ पर्यंत केवळ वहिती करीता च घेण्यात येत आहे.
२. लिलावात सहभागी होणा-या बोलीधारक यांना रकाना क्र. ०७ मध्ये निर्धारीत करण्यात आलेल्या प्रती एकर किमतीपेक्षा जास्त बोली बोलणे बंधनकारक राहील.
३. लिलावात भाग घेण्या करीता संबधीतारा रकाना क्र. ०७ मध्ये निर्धारीत करण्यात आलेल्या रकमेच्या २० टक्के. रक्कम अनामत (प्रतिएकर) रक्कम म्हणून भरणा करणे बंधनकारक राहील.
४. लिलावातून मिळालेल्या कोणत्याही शेतीचा उपयोग वहिती शिवाय करता येणार नाही. इतर प्रयोजनार्थ वापर आढळून आल्यास सदरहू शेती त्वरित परत ताब्यात घेतली जाईल व त्यावरील आपला वहीती बाबतचा हक्क समाप्त करण्यात येईल. भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येईल व कारवाईचा संपुर्ण खर्च संबंधीत व्यक्तीकडून व्याजासह वसूल करण्यात येईल.
५. अनामत रक्कम स.न. ग.नं. निहाय तसेच क्षेत्र निहाय भरणा करणे आवश्यक राहील. लिलाव संपल्यानंतर अनामत रक्कम सोडुन इतर बोलीची रक्कम त्याच दिवशी पुर्ण रोख स्वरुपात भरावी लागेल.
६. हर्राशी बोली बोलल्यानंतर जास्त बोली बोलणाऱ्या व्यक्तीस शेती ताब्यात घेण्यासाठी दि. २८.०५.२०२६ रोजीचे सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत बोलीची सर्व रक्कम भरावी लागेल, नाही तर दुसऱ्या त्याच्यापेक्षा कमी बोली बोलणा- या व्यक्तीस रकमेचा भरणा करून त्या व्यक्तीस देण्यात येईल. बोली बोलणाऱ्यांनी पुर्ण रकमेचा भरणा न केल्यास सदरहु शेती ही त्या रकमेपेक्षा कमी बोली बोलणा-या इसमांना देण्यात येईल व त्यांना शेतजमीन ताब्यात दिली जाईल.
७. ज्याची बोली सर्वाधिक असेल परंतु सरकारी निर्धारीत किमतीपेक्षा कमी असेल तर शेतीचा लिलाव स्थगीत अथवा रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयाचे जाहीर लिलाव समितीने राखुन ठेवले आहे.
८. सर्वाधिक बोली आढळल्यास संबंधित शेती लिलाव संपल्यानंतर व त्याची राहिलेली रक्कम निर्धारित कालावधीत भरल्या नंतर ती शेती आहे त्या परिस्थितीत नियोजीत कालावधीसाठी ताब्यात देण्यात येईल. तसेच वरील भूखंडामध्ये असलेली लहान, मोठी ओली किंवा वाळलेली झाडे शेती लिलावात घेतल्या नंतर इसमास तोडण्याचे अधिकार राहणार नाही. तरी तसे आढळून आल्यास कालमर्यादेसाठी असलेल्या वहितीदारास पुर्णपणे जबाबदार धरण्यात येऊन त्याचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.
९. या पूर्वी हर्रासीत ज्या व्यक्तींनी शेतजमीन घेतलेली आहे व दिलेल्या मुदतीत पैशाचा भरणा केला नाही. अशा कसुरदार व्यक्तीना बोली बोलण्याचा अधिकार राहणार नाही.
१०. हर्रासीत बोली बोलणा-या व्यक्तीस तो ज्या गावचा रहिवासी आहे. त्या बाबत स्वतःचे ओळखपत्र (मतदानकार्ड/ आधारकार्ड तसेच इतर ओळखपत्र सादर करणे आवश्यक राहील व ओळखपत्राच्या झेरॉक्सची सत्यप्रत सादर करावी. जे व्यक्ती ओळख पत्राची सत्य प्रत आणणार नाही त्यास लिलावामध्ये बोलता येणार नाही.

**टिप:-**
शेतीची हर्राशी करतांना एखादे शेतीची हर्राशी न झाल्यास किवा एखाद्या शेतीच्या लिलावाची रक्कम भरणा न केल्यास अशा शेतीची दि. २९.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता पासून शासकीय धान्य नविन गोडावून क्र. ०६, उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे मागे ता. मुर्तिजापूर जि. अकोला येथे हर्राशी करण्यात येईल. याची कृपया नागरिकांनी नोंद घ्यावी.

**उपविभागीय अधिकारी**
**मुर्तिजापूर**

वि.मा.का/अम/जाहि/१५९/२०२६-२०२७

## श्री. रवि महाले, तहसिलदार, कारंजा यांचे कार्यालय, कारंजा

रा.मा.क्र. टी. एन. सी-४३/पानविहीर/ /२०२५-२६

### जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, अर्जदार श्री. मनोहर मारोती गिरमकर रा.ता.कारंजा यांचे मालकीची व ताब्यातील मौजे पानविहीर ता. कारंजा येथे सर्व्हे नं./गट नं.५८ मध्ये १.२२ हे.आर. पो.ख. क्षेत्र ०.०४.०० हे. आर. आकार रु. पै. ३.०४ भोगवटदार वर्ग-१ शेत जमीन असून, या शेत जमीनीचे संरक्षीत कुळ म्हणून महादेव पांडूरंग सन १९५८-५९ नुसार वहितदार दाखविलेला आहे. सदर जमीन अर्जदार यांनी पांडुरंग राघोजी बारबोले यांच्याकडून दि.२३.०४.८२ रोजी दस्त क्र.८६० नुसार विकत घेतली असून, ७/१२ वरील संरक्षीत कुळ धारकाकडून अर्जदार यांनी खरेदी हक्काने पांडुरंग राघोजी यांच्यापासून घेतली असून ७/१२ वर पांडूरंग राघोजी बारबोले यांच्या मुलगा महादेव पांडूरंग यांचे नाव ७/१२ चे इतर अधिकारातून कमी करणे करीता अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

याबाबत कोणास हरकत/ आक्षेप दाखल करावयाचा असल्यास त्यांनी सदरचा जाहीरनामा प्रशिध्द झाल्यापासून (कर्यालयीन सुटटीचे दिवस वगळून) १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात हरकती /आक्षेप सादर करावे विहित मुदती नंतर आलेल्या आक्षेप /हरकत अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

स्थळ : कारंजा
दिनांक : ०८/०४/२०२६

**( रवि महाले )**
**तहसिलदार, कारंजा**

### दिन विशेष

## जगातील पहिला TV रिमोट कंट्रोल बनविणारा यूजीन पॉली



आज पुण्यतिथी

यूजीन पॉली हे अमेरिकन अभियंता होते, ज्यांनी १९५५ मध्ये जगातील पहिल्या वायरलेस टीव्ही रिमोट कंट्रोलचा शोध लावला. त्यांच्या या शोधामुळे टीव्ही पाहण्याच्या पद्धतीत क्रांती झाली आणि प्रेक्षकांना जागेवरून न उठता टीव्ही नियंत्रित करणे शक्य झाले.यूजीन पॉली आणि त्यांच्या रिमोट कंट्रोलबद्दलची मुख्य माहिती खालीलप्रमाणे आहे.

१९५५ मध्ये त्यांनी 'फ्लॅशमॅटिक' (इंर्दप्-र्डेग्म्) नावाचा पहिला वायरलेस रिमोट बनवला. तो एका फ्लॅशलाईटसारखा होता, ज्याच्या प्रकाशाच्या मदतीने टीव्हीच्या कोपऱ्यातील फोटोसेल्सवर प्रकाश टाकून चॅनेल आणि आवाज बदलता येत असे. ते झेनिथ रेडिओ कॉर्पोरेशन या कंपनीमध्ये अभियंता म्हणून कार्यरत होते.सुरुवातीचे रिमोट प्रकाशाच्या किरणांवर चालत असत. त्यानंतर १९५६ मध्ये त्यांच्याच सहकाऱ्याने (रॉबर्ट ॲडलर) अल्ट्रासोनिक लहरींवर चालणारा रिमोट तयार केला. टीव्ही तंत्रज्ञानातील या महत्त्वपूर्ण योगदानासाठी यूजीन पॉली यांना १९९७ मध्ये प्रतिष्ठित एमी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. २० मे २०१२ रोजी अमेरिकेत वयाच्या ९६ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. आजकाल टीव्हीसोबत रिमोटही मिळतो. ज्याद्वारे तुम्ही सहजपणे टीव्ही कंट्रोल करू शकता. चॅनल बदलायचं असेल किंवा आवाज कमी-जास्त करायचा असेल अशी वेगवेगळी कामे रिमोटद्वारे केली जातात. पण तुम्हाला माहीत आहे का की, जगातील पहिलं रिमोट कसं होतं? याचा आविष्कार कसा झाला होता? कदाचित माहीत नसेल. भारतात टीव्ही तर अनेक दशकांआधी आला होता. पण तेव्हा टीव्हीसोबत रिमोट येत नव्हता. त्यावेळी लोकांना टीव्हीचं चॅनल बदलण्यासाठी किंवा आवाज कमी-जास्त करण्यासाठी उठून टीव्हीजवळ जावं लागत होतं. यात जास्त वेळ जात होता. सगळ्यात आधी एक मशीन बनवण्यात आली होती. ज्याच्या मदतीने टीव्हीचं चॅनल बदलता येत होतं. पण त्यासाठी मशीन टीव्हीला जोडावी लागत होती. ही मशीन लोकांना काही आवडली नाही. १९५० च्या दशकात अमेरिकन इलेक्ट्रॉनिक्स कंपनीचे प्रमुख यूजीन एफ मॅक्डॉनल्ड यांनी कंपनीच्या इंजिनिअर्सना एक असं यंत्र बनवण्यास सांगितलं ज्याद्वारे बसल्या बसल्या चॅनल बदलता यावं. यूजीच्या सांगण्यावरून १९५५ मध्ये जेनिथ कंपनीने एक उपकरण तयार केलं ज्याला 'फ्लॅशमॅटिक' म्हटलं जात होतं. याला रिमोट नाही तर फ्लॅशमॅटिक म्हटलं जात होतं. कारण हे प्रकाशाचा वापर करून टीव्ही कंट्रोल करत होतं. हे यंत्र जेनिथ कंपनीचे इंजिनिअर यूजीन पॉले यांनी बनवलं होतं. फ्लॅशमॅटिकमध्ये काही बटन होते. जेव्हा एखादी व्यक्ती याचं बटन दाबत होती तेव्हा एक प्रकाश निघत होता. जो टीव्हीवरील एका सेन्सरवर पडत होता. अशाप्रकारे टीव्ही कंट्रोल केली जात होती. पण फ्लॅशमॅटिकमध्ये फार कमी बटनं होते. ज्याद्वारे काही गोष्टीच कंट्रोल केल्या जात होत्या. याचं एक नुकसानही होतं. फ्लॅशमॅटिक प्रकाशाने काम करत होतं. त्यामुळे कधी कधी सूर्याचा प्रकाश टीव्हीवर पडल्याने टीव्ही आपोआप चालू आणि बंद होत होती. सोबतच याची किंमतही खूप जास्त असायची. फ्लॅशमॅटिक खरेदी करण्यासाठी लोक त्यावेळी १०० डॉलर्स खर्च करत होते.ज्या एका हातात मावण्यासारख्या यंत्राच्या मदतीने आपण कुठलेही इलेक्ट्रॉनिक उपकरण लांबूनच नियंत्रित करू शकतो, त्याला रिमोट कंट्रोल म्हणतात. थोडक्यात त्याला दूरनियंत्रक असे म्हणता येईल. टी.व्ही., मोबाईल फोन, मोटार, व्हिडिओ कॅमेरा, लॅपटॉप, मायक्रोवेव्ह ओव्हन अशा असंख्य साधनांचे नियंत्रण या पद्धतीने करता येते. त्यामुळे आता प्रत्यक्ष या यंत्रांची बटणे

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. २० मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अवैध धंद्यांवर पोलिसांची कारवाई शून्य



**तेल्हारा :** शहरात सुरू असलेल्या वरली, मटका आणि गुटखा विक्रीच्या अवैध धंद्यांबाबत दै. सिटी न्यूजने सुपरफास्ट बातमी प्रकाशित करून संपूर्ण प्रकार उघडकीस आणला. मात्र एवढे होऊनही संबंधितांवर पोलिसांकडून कोणत्याही प्रकारचे गुन्हे दाखल करण्यात आले नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शहरातील भरचौकात आणि शाळा परिसरात सुरू असलेल्या वरली-मटक्याच्या अड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जात असल्याचे वास्तव समोर आले आहे. अल्पवयीन युवक आणि विद्यार्थी या अवैध धंद्यांकडे आकर्षित होत असल्याने पालक वर्ग चिंतेत आहे. तरीही प्रशासन आणि पोलीस विभाग मात्र मूकदर्शकाची भूमिका घेत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. विशेष म्हणजे या अवैध धंद्यांविरोधात सातत्याने आवाज उठवणाऱ्या पत्रकारांना आता थेट अपमानास्पद भाषेत बोलले जात असल्याची माहिती समोर येत आहे. काही वरली धारक पत्रकारांना वेगवेगळ्या प्रकारे बोलून मानसिक त्रास देत असून 'काय करायचे ते करा', 'आमचे काहीच बिघडत नाही' अशा उर्मट भाषेचा वापर केला जात असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. पत्रकारांनी समाजहितासाठी आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी हा विषय उचलून धरला असताना संबंधितांवर कारवाई होण्याऐवजी पत्रकारांनाच दबावाखाली आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला जात आहे. 'लाल नोटींच्या जोरावर सर्व काही मॅनेज होते,' अशा चर्चांमुळे पोलिसांच्या भूमिकेवरही संशय निर्माण होत आहे.

# युवकाची मन नदी पात्रात आत्महत्या

**बाळापूर :** बाळापूरच्या मन नदीच्या छत्री डोहामध्ये शहरातील बाकडे चौक गुजराथीपुरा येथील रहिवासी प्रतिक रमेश सत्तीवाले या २४ वर्षीय युवकाने आत्महत्या केल्याची घटना घडली. हा युवक मंगळवारी सकाळी ९.३० वाजताच्या दरम्यान घरुन निघुन गेला. परिवारातील सदस्य त्याचा शोधा शोध घेत होते. परंतु अचानक दुपारी १२ ते १ वाजे दरम्यान मन नदीजवळ जयसिंह राजा छत्री जवळ पाण्यात तरंगत असताना त्याचा मृतदेह दिसुन आला. यावेळी शहरातील, नागरिकांनी त्या ठिकाणी एकच गर्दी केली.

बाळापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रकाश झोडगे ताफ्यासह घटनास्थळी दाखल होऊन मृतदेह बाहेर काढण्यात आला. यावेळी मृतदेह बाळापूर ग्रामीण रुग्णालय येथे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. पंकज सत्तीवाले यांनी बाळापूर पोलिस स्टेशनला तक्रार दिली. याप्रकरणी बाळापूर पोलीसांनी आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद केली आहे.

# अकोटमध्ये नीट पेपरफुटी आणि गॅस दरवाढीविरोधात शिवसेना (उबाठा) गटाचे आंदोलन

प्रतिनिधी २० मे




**अकोट :** देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट परीक्षा पेपरफुट प्रकरणाच्या निषेधार्थ शिवसेना (उबाठा) गटाच्या वतीने अकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मंगळवारी तीव्र आंदोलन करण्यात आले. या वेळी संतप्त शिवसैनिकांनी पेपरफुटी प्रकरणातील संशयित आरोपींच्या प्रतिमांना काळे फासून आणि चपला मारून संताप व्यक्त केला.

यावेळी आंदोलकांनी गॅस सिलेंडर दरवाढीचाही निषेध नोंदवला. बैलगाडी वर दुचाकीं व रिकामे गॅस सिलेंडर बांधून केंद्र सरकारच्या महागाईविरोधात प्रतीकात्मक आंदोलन करण्यात आले.

आंदोलनात नीट पेपरफुट प्रकरणातील सर्व आरोपींवर कठोर कारवाई करून जन्मठेप अथवा देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी एनटीएवर कठोर निर्बंध आणावेत तसेच वाढलेले गॅस व इंधन दर तातडीने कमी करावेत, अशा मागण्या करण्यात आल्या.

सदर आंदोलन शिवसेना उपनेते आ. नितीन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यावेळी उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे, तालुकाप्रमुख अविनाश गावंडे, सहकार सेना जिल्हाप्रमुख प्रा. अतुल म्हैसने, डॉ. प्रशांत आढाऊ, कमल वर्मा, रोशन पर्वतकर, अक्षय घायल यांच्यासह शिवसैनिक, युवासेना पदाधिकारी, महिला आघाडीच्या सदस्य, विद्यार्थी-पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नियमित वाचा सिटीन्यूज सुपरफास्ट

# रोहणखेड येथील युवकांचा भाजपात प्रवेश



प्रतिनिधी २० मे

**अकोला :** आमदार रणधीर सावरकर यांची सक्रियता कार्यकर्त्यांचा सन्मान त्यांच्या भावना समजून शेतकरी आणि ग्रामस्थ व शहरी भागाचा विकास करण्याचा संकल्प या भूमिकेमुळे रोहणखेड येथील अनेक तरुणांनी भारतीय जनता पार्टी मध्ये प्रवेश केला.

यावेळी आमदार रणधीर सावरकर यांनी दुपट्टा देऊन त्यांचा सत्कार केला व त्यांच्या कर्तुत्वाचा लाभ पक्ष विस्तारासाठी घेण्यात येईल असा विश्वास घेऊन त्यांचा योग्य तो सन्मान पक्षात केल्या जाणार असे सांगून

ओम झांबरे, विकेश झांबरे, दर्शन झांबरे, विठ्ठल झांबरे ,लखन झांबरे, हर्षल झांबरे करण झांबरे ,नमन झांबरे ,मयूर झांबरे, भूषण झांबरे, देवानंद आंग्रे, वेदांत झांबरे, कार्तिक झामरे ,भारत चोपडे यांच्या नेतृत्वात अनेक नव युवकांनी भाजपामध्ये जाहीर पक्ष प्रवेश केलाङ, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भाजपा जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर हे होते तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन सरचिटणीस राजेश नागमते यांनी केले.

यावेळी मंचावर मंडळ अध्यक्ष विठ्ठल वाकोडे, विजुभाऊ सोळंके ,सरपंच राहुल झांबरे, ज्ञानेश्वर झांबरे अशोक झांबरे, रणजीत झांबरे, बाळासाहेब झांबरे सुनील झांबरे त्रिंबकराव झांबरे शरद वानखडे व गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होतेङ

# सेवानिवृत्ती कार्यक्रमात शैक्षणिक कार्याला उजाळा




**अकोला :** जिल्हा परिषद शाळे मधून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचा सेवानिवृत्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन जिल्हा परिषद प्राथमिक उर्दु शाळा ताजनापेठ येथे ज्ञानेश्वर मांडेकर सेवानिवृत्त केन्द्रप्रमुख यांच्या नियंत्रणात १८ मे ला आयोजित करण्यात आला . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ सेवानिवृत्त केंद्रप्रमुख अजय बांडी होते. तर प्रमुख अतिथी म्हणून सतीश दोडके , प्रकाश चतरकर , रजनिश ठाकरे, राजेश देशमुख व्यासपिठावर उपस्थित विराजमान होते. सेवानिवृत्त शिक्षक शशिकांत गायकवाड , मो. अथर परवेज मो. हुसेन , धनराज आंबेकर, भास्कर पातुर्डे , सुधाकर कुचर, मधुसुदन घावट ,राजकन्या सावळे, वंदना पिंपळे,तनविर फिरदोस मॅडम , सतीश देशमुख यांना सेवानिवृत्त निमित्य शाल श्रीफळ देवून मान्यवरांनी यथोचित सन्मान केला .तर मुकंद देशमुख , गजानन काळे, गोकुळ कलंत्री कार्यक्रमाची धुरा सांभाळली. यावेळी सेवानिवृत्त मंडळीनी आपल्या भावना व्यक्त करताना शैक्षणिक क्षेत्राची प्रतिमा उंचावणे, शैक्षणिक क्षेत्रातील अडचणी - समस्या दूर करण्यासाठी कार्य करण्यात यावे अशी अपेक्षा केली.

### जीएमसी मधील वार्ड क्रं. ३१ मध्ये भरती बेवारस रुग्णाची ओळख पटविण्याचे आवाहन



**अकोला :** १७ मे रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या वार्ड क्रमांक ३१मध्ये रिसोड येथील प्रकाश घुगे ५४ यांच्यावर मेडिसिन विभागात उपचार सुरू आहे. परंतु अजून कोणीही नातेवाईक किंवा ओळखीचे रुग्णाची ओळख पटविण्यासाठी पुढे आलेले नाहीत. सदर रुग्णाची कोणालाही ओळख पटल्यास किंवा नातेवाईक असल्यास त्यांनी सर्वोपचार रुग्णालयाचे समाजसेवा अधीक्षक लक्ष्मीकांत शिंगोटे यांच्याशी संपर्क करावा. अधिष्ठाता डॉ.संजय सोनुने यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ.श्यामकुमार सिरसाम यांच्या देखरेखीमध्ये मेडिसिन विभागाचे विभाग प्रमुख डॉ.मुकुंद अष्टपुत्रे, डॉ.सुनीता आडे

# जय, वैष्णवी वानखडेचे जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षकांकडून कौतुक

**अकोला :** स्नॉट ऑलंपियाड मार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये विविध विषयामध्ये चांदूर येथील जिप शाळेच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळविले. इयत्ता सहावीतील जय विनोद वानखडे राष्ट्रीयस्तरावर प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. तर वैष्णवी वानखडे जिल्हास्तरीय गणित परीक्षेत यशस्वी झाली. जिल्हाधिकारी वर्षा मीना आणि पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दोघांचे कौतुक केले. तसेच भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. नुकतीच त्यांची भेट घेतली.

जयचे वडील विनोद वानखडे यांचे देखील अभिनंदन केले. जिप शाळेतील एकूण ६३ विद्यार्थी जिल्हास्तर गुणवत्ता यादीत झळकले आहेत. जय याने इंग्लिश,सायन्स, मॅथ आणि जीके मध्ये नेत्रदीपक यश मिळवले. विद्यार्थ्यांच्या नेत्रदीपक कामगिरीमुळे सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव होत



# सुंदर साड्यांचा अमृतवाडी मध्ये महासेल

## २० ते २४ मे दरम्यान पाच दिवसांसाठी सुवर्णसंधी

प्रतिनिधी २० मे

**अकोला :** अमृतवाडी मध्ये बुधवार, २० मे पासून एकाच छताखाली सुंदर सुंदर साडयाचा मोठा खजिना राहणार आहे. ज्यामध्ये बनारसी , जॉर्जेट, शिफॉन, वायल, गार्डन वरेली, पैठणी, इरकली, नारायण पेठी, कांजीवरम, बनारसी, पोचमपल्ली, संबलपुरा, चंदेरी, पटोला, कोसा, प्युअर सिल्क, कॉटन सिल्क, पार्टीवेअर कलेक्शन, वेडिंग कलेक्शन एकापेक्षा एक सुंदर साड्यांचे कलेक्शन असेल.




काय सुंदर साडी आहे ग.., पदरावरची नक्षी तर बाई किती सुरेख...कुठून घेतलीस ?,,,, असे जर तुम्हाला एखाद्या समारंभात कुणी विचारले तर तुमचा उर अभिमानाने भरून येईल. त्याला कारणही तसेच कारण साडी म्हणजे मायेची अलगद मिठी. अशा सुंदर साड्यांसाठी एकदा भेट द्या शहरातील अमृतवाडी येथील यावर्षीच्या सर्वात मोठ्या सेलला या सेलमध्ये पंधराशे ते दोन हजार रुपये पर्यंतच्या किमती साड्या मिळतील केवळ २०० २५० ते ३०० रुपया पर्यंत. एकाच छताखाली सुंदर सुंदर साडयाचा मोठा खजिना ज्यामध्ये बनारसी , जॉर्जेट, शिफॉन, वायल, गार्डन वरेली, पैठणी, इरकली, नारायण पेठी, कांजीवरम, बनारसी, पोचमपल्ली, संबलपुरा, चंदेरी, पटोला, कोसा, प्युअर सिल्क, कॉटन पार्टीवेअर कलेक्शन, वेडिंग कलेक्शन एकापेक्षा एक सुंदर साड्यांचे कलेक्शन तर मग वाट कसली पाहता? हा सेल केवळ २० मे ते २४ मे या पाच दिवसासाठीच उपलब्ध. ही संधी दवडू नका असे आवाहन करण्यात आले आहे.

# मास्टर पॉवर स्विमिंग क्लबच्या खेळाडूची पोलीस दलात झेप

प्रतिनिधी २० मे

**अकोला :** येथील मास्टर पॉवर स्विमिंग क्लबचा एक होतकरू आणि कष्टाळू खेळाडू/सहकारी हर्षदीप रमेश कांबळे याची पोलीस भरती प्रक्रियेत नागपूर शहर पोलीस दलात निवड झाली आहे. त्याच्या या यशामुळे क्लबच्या वतीने आणि परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

हर्षदीप रमेश कांबळे हा गेल्या अनेक दिवसांपासून अकोला जिल्ह्यातील वसंत देसाई क्रीडांगणा वर सराव करत होता. जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर त्याने पोलीस भरतीतील शारीरिक चाचणी आणि लेखी परीक्षेत उत्तम गुण मिळवून हे यश संपादन केले आहे. त्याच्या या निवडीमुळे क्लबमधील इतर खेळाडूंनाही प्रेरणा मिळाली आहे.



या यशाबद्दल मास्टर पॉवर स्विमिंग क्लबच्या व क्रीडा अधिकारी अकोला. सतीशचंद्र भट यांच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन त्याचा सत्कार करण्यात आला. व त्यांचे वडील रमेश कांबळे यांचा सत्कार पवन केडीया यांनी केला. तसेच त्यांची आई सौ. मंगला खंडारे यांचा सत्कार क्लब च्या महिला प्रशिक्षक ज्योती पनपालिया यांनी केला. क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट यांनी क्लबचे संचालक योगेश पाटील यांचा सुद्धा शाल व पुष्प गुच्छ देऊन सत्कार केला. योगेश पाटील म्हणाले 'आमच्या सहकाऱ्याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेले हे यश क्लबसाठी भूषणावह आहे. खदान पोलीस स्टेशन चे हेड कॉन्स्टेबल प्रवीण शिरसाट हे देखील उपस्थित होते. या निवडीबद्दल क्लबचे प्रशिक्षक विशाल पोहेकर, दिपक सदांशिव, प्रमोद खंडारे, सुशील कांबळे, ज्योती पनपालिया, व सर्व सदस्य मोहिल खरात, कौसर भाई, सैयद नूर, दिनेश वाघ, कविता जावरकर, रामकृष्ण रोहनकर, गौरी थोरात, आकाश यादव, सुमित बुंदेले, विक्की पवार, प्रथमेश डोईफोडे, गायत्री सरदार, सोनल भालेराव, अमन इंगळे, आदित्य थोरात, राम घुगे, कुणाल राऊत आणि मित्रपरिवाराने अभिनंदन केले.

# राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम बाबत सिटी टास्क फोर्स कमिटीची बैठक



**अकोला :** २८ जून २०२६ रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राज्यातील सर्व जिल्हा व मनपा कार्यक्षेत्रामध्ये राबविण्यात येणार आहे, या अनुषंगाने १९ मे २०२६ रोजी एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, अकोला महानगरपालिका, अकोला च्या वतीने शहरात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात सिटी टास्क फोर्स कमिटीची बैठक झाली.

या बैठकीत, गरोदर मातांचे लसीकरण, बालकांचे नियमित लसीकरण तसेच राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला, तसेच शहरातील लसीकरण कव्हरेज वाढविण्यासाठी उच्च जोखीम क्षेत्रे, स्थलांतरित व वंचित घटक यांच्यावर विशेष लक्ष देण्याबाबत चर्चा करण्यात आली. लसीकरणापासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये यासाठी सूक्ष्म नियोजन, क्षेत्रस्तरीय देखरेख, जनजागृती व आंतरविभागीय समन्वय अधिक बळकट करण्याचे निर्देश यावेळी मनपा आयुक्त डॉ.लहाने यांनी दिले, तसेच बैठकीदरम्यान विविध विभागांनी आपापल्या स्तरावर समन्वयाने काम करून लसीकरण मोहिम यशस्वी करण्याचे आवाहन आणि नियोजित कालावधीत उद्दिष्टपूर्ती करण्यावर भर देण्यात आला आहे.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी २८ जून २०२६ रोजी आपल्या ० ते ५ वर्ष वयोगटातील मुलांना जवळच्या लसीकरण केंद्रावर (बूथ) वर जाऊन पोलिओ लस द्यावी असे आवाहन मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांनी यावेळी केले आहे.

सदर बैठकीस मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार, मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.रूची पहूरकर, मनपा आरसीएच अधिकारी डॉ.विजय चव्हाण, मनपा शिक्षणाधिकारी हरिश्चंद्र इटकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.अनुप चौधरी, मलेरिया विभागाचे डॉ.नितीन गायकवाड, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा, शहर कार्यक्रम व्यवस्थापक पंकज गायकवाड, लसीकरण क्षेत्र संनियंत्रक राहूल उपरवट यांचेसह मनपातील सर्व नागरी आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी यांची उपस्थिती होती.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226

मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय

गायत्री नगर, अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. २० मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# फेरफार नोंदीसाठी 25 हजारांची लाच; परिरक्षण भूमापक एसीबीच्या जाळ्यात

### कळंब येथील कारवाई; चेंबरमध्येच स्वीकारली रक्कम

प्रतिनिधी २० मे



**यवतमाळ** : फेरफार नोंद करून देण्यासाठी २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना कळंब येथील भूमीअभिलेख कार्यालयातील परिरक्षण भूमापक महिला कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. या कारवाईमुळे महसूल व भूमीअभिलेख विभागात खळबळ उडाली आहे.

शितल विजयकुमार पांडे (वय ३७) असे आरोपी लोकसेविकेचे नाव आहे. त्या कळंब येथील भूमीअभिलेख कार्यालयात परिरक्षण भूमापक म्हणून कार्यरत आहेत.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे कोठा (वेणी) शिवारातील शेती व प्लॉट देखरेखीचे काम करतात. संबंधित प्लॉट मालकाचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या कायदेशीर वारसांची नावे फेरफारमध्ये नोंदविण्यासाठी तक्रारदारांनी आरोपी कर्मचाऱ्यांची भेट घेतली होती. यावेळी वारसांना कार्यालयात न बोलविता फेरफार प्रक्रिया पूर्ण करून देण्यासाठी २५ हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली होती.

त्यानुसार १८ व १९ मे रोजी पडताळणी करण्यात आली. त्यात लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर मंगळवारी सापळा कारवाई आयोजित करण्यात आली. कळंब येथील भूमीअभिलेख कार्यालयातील चेंबरमध्ये पंचांसमक्ष तक्रारदारांकडून २५ हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना आरोपी महिला कर्मचाऱ्याला एसीबी पथकाने पकडले. या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. ही कारवाई बापू बांगर व सचींद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अभय आष्टेकर, पोलीस निरीक्षक मनोज ओरके, अर्जुन घनवट व पथकाने केली. शासकीय कर्मचाऱ्यांकडून लाचेची मागणी होत असल्यास नागरिकांनी अॅन्टी करप्शन ब्युरोच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# 'डेक्कन'चा नरमाईचा सूर; ऊस उत्पादकांचे थकीत १८ कोटी रुपये देण्याचे लेखी आश्वासन

प्रतिनिधी २० मे



**उमरखेड** : अतिवृष्टी, वाढलेला उत्पादन खर्च आणि आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर ऊस उत्पादक शेतकरी आधीच संकटात सापडले असताना डेक्कन शुगर प्रायव्हेट लिमिटेडकडून एफआरपीची रक्कम रखडल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी होती.

अखेर शेतकऱ्यांच्या आंदोलनानंतर कारखाना प्रशासनाने थकीत १८ कोटी रुपयांची रक्कम टप्प्याटप्प्याने देण्याचे लेखी आश्वासन दिल्याने उपोषण मागे घेण्यात आले.

विदर्भातील सर्वाधिक ऊस उत्पादन करणारा तालुका म्हणून उमरखेडची ओळख आहे. ईसापूर धरणाच्या डाव्या कालव्यातून सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्याने येथील शेतकरी मोठ्या प्रमाणावर ऊस पिकवितात. उमरखेडसह परिसरातील ऊस हिंगोली, नांदेड, लातूर, परभणी आणि यवतमाळ जिल्ह्यातील विविध साखर कारखान्यांकडे गाळपासाठी पाठविला जातो. मात्र, ऊसतोडीपासून ते एफआरपी मिळेपर्यंत शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

डेक्कन शुगर प्रायव्हेट लिमिटेडने यंदाच्या हंगामात सुमारे साडेतीन लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप केल्याचे सांगितले जाते. त्यात उमरखेड व हदगाव तालुक्यातील दीड ते दोन लाख मेट्रिक टन ऊसाचा समावेश होता. मात्र, डिसेंबर ते फेब्रुवारीदरम्यान गाळपासाठी गेलेल्या ऊसाची एफआरपी थकीत राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला होता.

या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी नेते चितंगराव कदम यांनी १६ मे रोजी आमरण उपोषण सुरू केले. आंदोलनाची दखल घेत शिवसेनेचे विदर्भ पश्चिम संपर्क प्रमुख पराग पिंगळे यांनी पालकमंत्री व प्रशासनाशी समन्वय साधला. त्यानंतर जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण आणि तहसीलदार योगेश देशमुख यांनी उपोषणस्थळी जाऊन चर्चा केली.

या चर्चेनंतर १४ कोटी रुपयांची रक्कम ३० मेपर्यंत आणि उर्वरित ४ कोटी रुपये १० जूनपर्यंत अदा करण्याचे लेखी आश्वासन कारखाना प्रशासनाने दिले.

उपोषणस्थळी माजी आमदार विजय खडसे, शिवसेना जिल्हाप्रमुख यशवंत पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद खोडे, सुदर्शन रावते, प्रविण मिराशे, डेक्कनचे जनरल मॅनेजर संजय पाटील, थावरानी यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# जिल्ह्यात १.०८ लाख मेट्रिक टन खतसाठा शिल्लक

प्रतिनिधी २० मे

**यवतमाळ** : आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात रासायनिक खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असून शेतकऱ्यांनी घाबरून खरेदी करण्याची आवश्यकता नसल्याचे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यात विविध प्रकारच्या खतांचा एकूण १ लाख ३९ हजार ९२४ मेट्रिक टन साठा उपलब्ध झाला होता. त्यापैकी ३१ हजार ४८९ मेट्रिक टन खताची विक्री झाली असून अद्याप १ लाख ८ हजार ४३५ मेट्रिक टन साठा विक्रेत्यांकडे उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्ह्यात युरिया खताचा २८ हजार ७४१ मेट्रिक टन साठा उपलब्ध झाला होता. त्यातील ९ हजार ६३१ मेट्रिक टन खताची विक्री झाली असून सध्या १९ हजार ११० मेट्रिक टन साठा उपलब्ध आहे. डीएपी खताचा ९ हजार ७८८ मेट्रिक टन साठा उपलब्ध असून त्यापैकी २ हजार २९६ मेट्रिक टन विक्री झाली आहे. त्यामुळे विक्रेत्यांकडे ७ हजार ४९२ मेट्रिक टन डीएपी शिल्लक आहे. एमओपी खताचा २ हजार ५८४ मेट्रिक टन साठा उपलब्ध झाला होता. त्यातील ५२७ मेट्रिक टन खताची विक्री झाली असून उर्वरित साठा उपलब्ध असल्याचे प्रशासनाने सांगितले. संयुक्त खतांचा सर्वाधिक ६९ हजार १५५ मेट्रिक टन साठा जिल्ह्यात उपलब्ध झाला होता. त्यापैकी १४ हजार ७७६ मेट्रिक टन विक्री झाली असून ५५ हजार १८० मेट्रिक टन साठा शिल्लक आहे.

# इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी २० मे



**पुसद** : शहरातील बस स्थानक परिसरात एका ४५ वर्षीय व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. धर्मार्थ पाणपोईजवळील जाहिरात फलकाच्या लोखंडी अँगलला नायलॉन दोरीच्या सहाय्याने त्यांनी गळफास घेतल्याचे आढळून आले. घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मृताची ओळख सचिन प्रकाश करपे (वय ४५, रा. दत्तनगर, आर्णी, जि. यवतमाळ) अशी पटली आहे. पोलिसांनी घटनास्थळी तपास केला असता त्यांच्या खिशात पुसद येथील एका खासगी रुग्णालयाची उपचाराची चिठ्ठी आढळून आली. त्यावरून ते १८ मे रोजी उपचारासाठी पुसद येथे आल्याची माहिती समोर आली. मात्र, त्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अक्षय सनगर व हेड कॉन्स्टेबल अतुल दातीर करीत आहेत.

दरम्यान, बस स्थानक परिसरात यापूर्वीही अशा प्रकारच्या घटना घडल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. परिसरात दिवसभर मोठी वर्दळ असतानाही पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसल्याची तक्रार नागरिकांनी केली.

पोलिस गस्त वाढवून सीसीटीव्ही यंत्रणा सक्षम करावी तसेच संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी हेलपाटे नकोत

### पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही; ब्लॉक लेव्हल बँकर्स समिती बैठकीत आ. वानखेडे यांचे निर्देश

प्रतिनिधी २० मे



**उमरखेड** : पंचायत समिती, उमरखेड येथे मंगळवारी ब्लॉक लेव्हल बँकर्स समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. ग्रामीण भागातील शेतकरी, महिला बचत गट, बेरोजगार युवक व सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची ठरली.

बैठकीत तालुक्यातील विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा तसेच बँकांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विशेषतः पीक कर्ज वितरण, नवीन पीक कर्ज प्रस्ताव, स्वयंसहाय्यता बचत गटांना कर्जपुरवठा आदी विषयांवर संबंधित अधिकाऱ्यांशी सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी आमदार किसनराव वानखेडे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेत बँक अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या. "पात्र शेतकरी एकही वंचित राहता कामा नये. पीक कर्जासाठी शेतकऱ्यांना वारंवार बँकांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत," असे त्यांनी सांगितले.

"शेतकरी हा केवळ अन्नदाता नसून देशाच्या प्रगतीचा खरा शिल्पकार आहे," असे नमूद करत त्यांनी प्रलंबित पीक कर्ज प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्याचे निर्देश दिले. तसेच नवीन कर्ज प्रस्ताव मंजूर करण्यास गती देण्याच्या सूचना बँक प्रशासनाला करण्यात आल्या.

ग्रामीण भागातील महिला बचत गटांना सहज कर्जपुरवठा व्हावा, युवकांना मुद्रा योजनांचा लाभ मिळावा तसेच शासनाच्या योजना तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासन आणि बँक यंत्रणेमध्ये अधिक समन्वय आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

बैठकीत जिल्हा व्यवस्थापक ज्ञानेश्वर टापरे, गटविकास अधिकारी किरण कोळपे, विविध राष्ट्रीयीकृत बँकांचे शाखा व्यवस्थापक तसेच बँक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दारव्हा येथे दुचाकीच्या धडकेत युवक ठार

प्रतिनिधी २० मे

**दारव्हा** : दोन दुचाकीची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एका युवकाचा उपचाराला नेताना मृत्यू झाला. तीन जण जखमी झाले. ही घटना सोमवारी (१८ मे) रात्री ८:३० वाजताच्या सुमारास येथील दिग्रस बायपास रोडवर घडली.

लक्ष महेश गांधी (१८), असे मृताचे नाव आहे. जीत भगत, क्षितिज खडसे आणि विजय कनोजे जखमी आहेत. बायपास मार्गावर ट्रकला ओव्हरटेक करताना एमएच २९ - एसी ७१६५ आणि एमएच २९ - एपी ३६१६ या क्रमांकाच्या दुचाकीमध्ये जोरदार धडक झाल्याचे सांगण्यात आले. दोन्ही दुचाकीवरील युवक खाली कोसळून गंभीर जखमी झाले. गंभीर स्थितीत असलेल्या लक्ष याचा नागपूर येथे नेत असताना मृत्यू झाला.

# २२ मेपर्यंत उष्णतेची लाट; नागरिकांनी दुपारचे उन्ह टाळावे

### जिल्हा प्रशासनाच्या आरोग्यविषयक मार्गदर्शक सूचना जारी

प्रतिनिधी २० मे

**यवतमाळ** : भारतीय हवामानशास्त्र विभागाने जिल्ह्यात २२ मेपर्यंत उष्णतेच्या लाटेचा इशारा दिल्यानंतर जिल्हा प्रशासनाने नागरिकांसाठी विशेष मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. वाढत्या तापमानाचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होण्याची शक्यता लक्षात घेता आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.

प्रशासनाने जारी केलेल्या सूचनांनुसार नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे. उष्णतेपासून बचावासाठी भरपूर पाणी, ओआरएस, लिंबूपाणी तसेच फळांचे सेवन करावे. हलक्या रंगाचे सुती कपडे वापरण्यासोबतच डोक्यावर टोपी, गमछा किंवा छत्रीचा वापर करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. लहान मुले, गर्भवती महिला, वृद्ध आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

बांधकाम, शेती, रस्ते आणि औद्योगिक क्षेत्रातील कामगारांनी थेट उन्हात सलग काम करणे टाळावे. शक्यतो सकाळी लवकर किंवा सायंकाळी कामांचे नियोजन करावे. प्रत्येक ३० ते ४५ मिनिटांनी पाणी पिणे आवश्यक असून कामाच्या ठिकाणी सावली, पिण्याचे पाणी आणि विश्रांतीची व्यवस्था ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. हेल्मेट, कॅप, हातमोजे आणि सुरक्षात्मक कपड्यांचा वापर करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

आरोग्य विभागाला प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ओआरएस, आवश्यक औषधे आणि आपत्कालीन उपचार सुविधा उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ग्रामपंचायत व नगर परिषदांनी सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, तर शिक्षण विभागाने शाळांच्या वेळांमध्ये आवश्यक बदल करून विद्यार्थ्यांना उष्णतेपासून बचावाच्या सूचना द्याव्यात, असे प्रशासनाने म्हटले आहे. उष्माघाताची लक्षणे दिसल्यास संबंधित व्यक्तीला तातडीने थंड व सावलीच्या ठिकाणी हलवून थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात. ओआरएस किंवा पाणी द्यावे आणि प्रकृती गंभीर असल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी रुग्णवाहिका सेवेसाठी १०८, पोलीस मदतीसाठी १००, अग्निशमन दलासाठी १०१ तसेच आपत्ती व्यवस्थापन हेल्पलाईन १०७७ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे प्रशासनाने कळविले आहे.

# पुसदमध्ये १२ जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा

### एकता मल्टीपरपज सोसायटीचा सामाजिक उपक्रम

प्रतिनिधी २० मे

**पुसद** : एकता मल्टीपरपज सोसायटी यांच्या वतीने आयोजित "सामूहिक विवाह मेळावा – वर्ष दुसरे" अंतर्गत १२ नवदांपत्यांचा इज्तेमाई विवाह सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

शहरातील ग्रँड पॅलेस येथे नमाज-ए-मगरीबनंतर आयोजित या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या उपक्रमासाठी हाजी मो. इरफान, सय्यद इश्तियाक, रियासत अली, आयुकोद्दीन खतीब, अबरार खान, सय्यद सलमान, अब्दुल मजीद, अब्दुल जावेद, सादिक अहमद, मो. जाकिर तसेच अमजद खान पठाण बिल्डर यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वजाहत मिर्झा होते. तर उद्घाटन इंद्रनील नाईक यांच्या हस्ते झाले. यावेळी संजय देशमुख, नागेश पाटील अष्टीकर तसेच शेतकरी नेते वसीम देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

याशिवाय जैनुल सिद्दीकी, पुसद नगरपरिषदेचे आरोग्य सभापती मजहर खान, शेख कय्युम भाई आणि इंजिनिअर अन्वर अली यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.



सोहळ्यात नवदांपत्यांना आदर्श वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

उलेमा-ए-कराम यांच्या हस्ते नवदांपत्यांच्या सुखी संसारासाठी विशेष दुआ करण्यात आली. कार्यक्रमाला विविध समाजघटक, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'नीट' घोटाळ्यांमुळे शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता धोक्यात

### शैक्षणिक व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह; माजी शिक्षणमंत्री पुरकेंचा हल्लाबोल

प्रतिनिधी २० मे

**यवतमाळ** : वैद्यकीय शिक्षणासाठी घेतल्या जाणाऱ्या 'नीट' परीक्षेतील कथित घोटाळ्यांमुळे देशातील शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता धोक्यात आली असल्याची टीका माजी शिक्षणमंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वसंत पुरके यांनी केली. "शैक्षणिक वृक्षाला लागलेली विषारी फळे विद्यार्थ्यांसाठी घातक ठरत आहेत," अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला. यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

केंद्रात भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर शिक्षण क्षेत्रातील घोटाळ्यांचे प्रमाण वाढल्याचा आरोप करत पुरके यांनी नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि गैरप्रकारांवर जोरदार टीका केली. देशभरात विविध स्पर्धा परीक्षांमध्ये पेपरफुटीच्या घटना घडल्याने लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान झाले असून, या गंभीर प्रकरणांकडे शिक्षण मंत्रालयाने अपेक्षित गांभीर्याने पाहिले नसल्याचे त्यांनी म्हटले.

तंत्रज्ञान व वैद्यकीय शिक्षणासाठी प्रशिक्षण देणाऱ्या काही नामांकित कोचिंग संस्थांतील संचालक आणि शिक्षकांचाही या गैरप्रकारात सहभाग असल्याच्या चर्चा समोर येत असल्याने विद्यार्थ्यांचा परीक्षांवरील विश्वास डळमळीत होत असल्याचे त्यांनी सांगितले. "नीटसारख्या परीक्षांमध्ये गैरप्रकार होत असतील, तर यूपीएससीसारख्या सर्वोच्च स्पर्धा परीक्षांच्या विश्वासार्हतेबाबतही प्रश्न निर्माण होऊ शकतात," अशी चिंताही त्यांनी व्यक्त केली.

शासकीय शाळा बंद करून खासगी शिक्षणसंस्थांना प्रोत्साहन देण्याचे धोरण समाजासाठी घातक असल्याची टीका करत, शिक्षण क्षेत्रात पैशांच्या जोरावर संधी उपलब्ध होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.



राजकीय संवादातील सभ्यता हरवत असल्याची खंत

राजकारणातील टीकेची पातळी खालावत चालल्याबद्दलही पुरके यांनी चिंता व्यक्त केली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविषयी करण्यात आलेल्या "रिजेक्टेड माल" या वक्तव्याचा निषेध करत त्यांनी पूर्वीच्या राजकीय संवादसंस्कृतीची आठवण करून दिली. जवाहरलाल नेहरू, अटल बिहारी वाजपेयी आणि शरद पवार यांच्या काळात मतभेद होते; मात्र मनभेद नव्हते, असे सांगत त्यांनी राजकीय सभ्यता जपण्याचे आवाहन केले.

### महिला सुरक्षेवरून सरकारवर टीका

■ महाराष्ट्रातील महिला सुरक्षेच्या प्रश्नावरूनही पुरके यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला. राज्यात बलात्कार, विनयभंग आणि महिला बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचा दावा करत महिलांच्या सुरक्षेबाबत सरकार अपयशी ठरत असल्याचा आरोप त्यांनी केला.

### शेतकरी प्रश्नावर सरकारला धारेवर

■ यवतमाळ जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण गंभीर असल्याची खंत व्यक्त करत पुरके यांनी कृषी धोरणांवरून सरकारवर टीका केली. नैसर्गिक संकटामुळे शेतकरी अडचणीत असतानाही जिल्ह्याला पीक विमा मदतीपासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. खरीप हंगामासाठी कर्ज मिळविताना शेतकऱ्यांना बँकांच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागत असून, बियाण्यांसोबत खताची सक्तीची लिंकेज करून आर्थिक लूट सुरू असल्याचाही आरोप त्यांनी केला. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देणाऱ्या महायुती सरकारने सत्तेत आल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष केल्याची टीका करत, शेतकऱ्यांवरील अन्याय थांबविण्यासाठी तातडीने ठोस निर्णय घेण्याची मागणी त्यांनी केली. पत्रकार परिषदेला अॅड. सीमा तेलंगे-लोखंडे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी झरीजामणी यांचे कार्यालय,**

क्रमांक/अका/ प्रस्तु 2/कावी/30/2026

दिनांक 26/02/2026

## जाहीरनामा

प्रकरणात ग्राम पंचायत अधिकारी निंबादेवी यांनी स्नेहल शंकर पेंदोर रा. निंबादेवी यांची जन्म दि 28/07/2008 रोजी मौजा निंबादेवी येथे झाला असून त्यांची जन्माची नोंद त्यावेळी ग्रामपंचायतला माहिती अभावी केली नसल्याने जन्म नोंदणी अभिलेखामध्ये नोंद उपलब्ध नाही. सबब सदर तारखेची जन्माची नोंद ग्राम पंचायत निंबादेवी येथील जन्म नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याचा आदेश पारीत करावा. याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे.

करिता सर्व नागरीकांना याद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जानुसार उपरोक्त व्यक्ती यांचे जन्म दि. 28/07/2008 ची नोंद ग्रामपंचायत निंबादेवी येथील जन्म नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याबाबत ज्या कोणासही काही सांगावयाचे असल्यास अथवा काही आक्षेप घ्यावयाचा असल्यास त्यांनी सदरचा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसाचे आत या न्यायालयात हजर राहुन आपण किंवा आपल्या वकीलामार्फत सर्व पुरावे तसेच उपलब्ध असलेल्या दस्तऐवजासह आपले आक्षेप दाखल करावे.

याद्वारे पुढे असेही जाहीर करण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणाला काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन सदर अर्जावर सुनावणी करण्यात येवुन आदेश पारीत करण्यात येईल याची, सर्वांनी नोंद घ्यावी.

(शिक्का)

**(अक्षय रासने)**
**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी**
**झरीजामणी**

## अमरावतीत २२ मे रोजी मेगा रिटेल क्रेडिट आउटरीच कार्यक्रम

**अमरावती :** सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मेगा रिटेल क्रेडिट आउटरीच कार्यक्रमांतर्गत अमरावती येथे विशेष ग्राहक मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम दि. २२ मे रोजी सायंकाळी ६ वाजता एमआयडीसी रोडवरील गुणवंत लॉन येथे होणार आहे.

या मेळाव्यात आकर्षक व सुलभ कर्ज योजनांची विशेष माहिती देण्यासाठी रिटेल क्रेडिट आऊटरीच कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यात गृहकर्ज, वाहन कर्ज, व्यवसाय कर्ज, वैयक्तिक कर्ज, एज्युकेशन कर्ज, इतर किरकोळ कर्ज सुविधांची माहिती देण्यात येणार आहे. कार्यक्रमामध्ये तज्ज्ञांकडून मार्गदर्शन, तात्काळ सल्ला आणि ऑन-द-स्पॉट प्राथमिक मंजुरीची सुविधा उपलब्ध राहणार आहे. तसेच यावेळी इनप्रिन्सिपल सॅन्शन व चेक वितरण होणार आहे. मुख्य अतिथी म्हणून रिजनल प्रबंधक उपस्थित राहतील. याबाबत अधिक माहितीसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा आणि योजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेड़ाऊ यांनी केले आहे.

महाआवास अभियान 2023-24

# अमरावती विभागाची ऐतिहासिक कामगिरी ; महाआवास अभियानात राज्यात व्दितीय क्रमांक

- अमरावती विभागाने विविध स्तरावरील आठ पुरस्कार पटकाविले
- यवतमाळच्या लाभार्थ्याला 'देशातील ३ कोटीचे घरकुल' पूर्ण करण्याचा बहुमान
- विभागीय आयुक्तांकडून कौतुक आणि अपूर्ण कामे पूर्ण करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २० मे

**अमरावती :** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागामार्फत ग्रामीण भागातील बेघर कुटुंबांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'महाआवास अभियान २०२३-२४' मध्ये अमरावती विभागाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करत अमरावती विभागाने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. सातारा येथे आयोजित कार्यक्रमात केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते या पुरस्काराचे तत्कालीन विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय, अपर आयुक्त (विकास) शालिनी कडू व उपायुक्त राजीव फडके यांना वितरण करण्यात आले.

अमरावती विभागाने विविध स्तरावर तब्बल आठ पुरस्कार पटकाविले असून, १५ मे रोजी, सातारा सैनिक स्कूल येथे आयोजित एका भव्य गौरव सोहळ्यात संबंधित विभाग प्रमुखांना पुरस्कार प्रदान करुन त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे व प्रधान सचिव एकनाथ डवले यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्यात विभागीय आयुक्त (अमरावती विभाग), अपर आयुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास),




अकोला व अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, आणि पातुर (जि. अकोला) चे गटविकास अधिकारी यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

**अमरावती विभागाला मिळालेले विविध स्तरांवरील पुरस्कार पुढीलप्रमाणे :** विभाग स्तरावर राज्य पुरस्कृत आवास योजनेत अमरावती विभागाला राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. जिल्हा परिषद स्तरावर अमरावती जिल्हा परिषदेला 'राज्य पुरस्कृत आवास योजनेत' राज्यात द्वितीय क्रमांक मिळाला आहे. अकोला जिल्हा परिषदेला 'प्रधानमंत्री आवास योजनेत' राज्यात तृतीय क्रमांक प्राप्त झाला आहे. पंचायत समिती स्तरावर अकोला जिल्ह्यातील पातूर पंचायत समितीला 'प्रधानमंत्री आवास योजनेत' राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. ग्रामपंचायत स्तरावर वाईगौळ ग्रामपंचायत (ता. मानोरा, जि. वाशीम) - प्रधानमंत्री आवास योजनेत तृतीय क्रमांक, बेलुरा बु. ग्रामपंचायत (ता. अकोट, जि. अकोला) - 'उत्कृष्ट बहुमजली इमारत' श्रेणीत तृतीय क्रमांक, देपूळ ग्रामपंचायत (ता. जि. वाशीम) - राज्य पुरस्कृत आवास योजनेत तृतीय क्रमांक प्राप्त झाला आहे.

### विभागीय आयुक्तांकडून कौतुक आणि आवाहन

या गौरव सोहळ्यास पुरस्कारप्राप्त जिल्ह्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच आणि ग्रामसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अमरावती विभागाच्या या दैदिप्यमान यशाबद्दल विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी सर्व यशस्वी अधिकारी, कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींचे मनापासून अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच, विभागात अद्याप अपूर्ण असलेली घरकुलांची कामे गतीने आणि गुणवत्तापूर्ण रितीने त्वरित पूर्ण करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

**यवतमाळच्या लाभार्थ्याला 'देशातील ३ कोटीचे घरकुल' पूर्ण करण्याचा बहुमान**

या सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील इनापूर येथील लाभार्थी दशरथ सवई-चव्हाण यांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत देशातील ३ कोटी क्रमांकाचे घरकुल पूर्ण करण्याचा ऐतिहासिक मान मिळवला. या अभूतपूर्व कामगिरीबद्दल केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चव्हाण व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांना त्यांच्या हक्काच्या घराची चावी प्रदान करून विशेषरित्या सन्मानित करण्यात आले.

## औषध विक्रेता बंदच्या पार्श्वभूमीवर नागरिकांसाठी हेल्पलाईन क्रमांक जाहिर

प्रतिनिधी २० मे

**अमरावती :** अखिल भारतीय औषधी विजेता संघटनेच्या वतीने बुधवार, दि. २० मे रोजी देशव्यापी एक दिवसीय औषधविक्री बंदची घोषणा करण्यात आली आहे. या बंदमुळे नागरिकांची गैरसोय होणार नाही, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने हेल्पलाईन क्रमांक जाहिर केले आहे.

बंदच्या काळात जिल्ह्यातील नागरिकांनी अत्यावश्यक औषधांचा पुरवठा अखंडीत व सुरळीत उपलब्ध राहावा, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केली आहे. सहआयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेते, रुग्णालयांशी संलग्न औषध दुकाने, तसेच २४ तास सुरु असणाऱ्या औषध दुकानांनी समन्वय साधण्यात येत आहे. यात अत्यावश्यक औषधांचा पुरवठा खंडित होणार नाही यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत.

नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, तसेच औषधांचा अनावश्यक साठा करू नये, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. औषध उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण उद्भवल्यास नागरिकांनी हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले ओ. अन व औषध प्रशासन, अमरावती कार्यालया हेल्पलाईन क्रमांक - गजानन घीरके, सहायक आयुक्त (औषधे) वाशिम, अमरावती- ९८५०१५०६८७, मनिष गोतमारे, औषध निरीक्षक, वाशिम, अमरावती ९५५२५७४४९५, तालुकानिहाय आपत्कालीन औषध उपलब्धता हेल्पन्राईन क्रमांक - अमरावती शहर - प्रविण देशमुख ९४२२१५८४०९, संजय बोबडे ९४२२१५७६१५, सौरभ मालानी ९४२३८१२३४५, मनोज डफळे ९८२३२०५२५०, राजा नानवाणी ९८२२६४३२२६ येथे संपर्क साधावा, असे आवाहन सह आयुक्त (औषधे) करण्यात मि. कृ. काळेश्वरकर यांनी केले आहे.

# पांढरकवडा आदिवासी विकास प्रकल्पात 'ट्रायबल फेलो' पदांसाठी भरती

## इच्छुकांनी मुलाखतीसाठी २५ मे रोजी उपस्थित राहण्याचे आवाहन

प्रतिनिधी २० मे

**अमरावती :** यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत दोन 'ट्रायबल फेलो' पदांसाठी भरती प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. ही नियुक्ती १० महिन्यांच्या कालावधीसाठी करण्यात येणार असून निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा २० हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी दि. २५ मे २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजल्यापासून वॉक-इन




इंटरव्ह्यूसाठी आवश्यक कागदपत्रांसह एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा येथे उपस्थित राहण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी रेवैयाह डोंगरे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

'ट्रायबल फेलो' पदासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा आणि किमान ६० टक्के गुण प्राप्त केलेले असावेत. उमेदवारांना संगणक व इंटरनेटचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांचे वय २१ ते २६ वर्षांच्या दरम्यान असावे. याशिवाय, किमान एक वर्षाचा स्वयंसेवी संस्थेमध्ये कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे. आदिवासी क्षेत्रात आदिवासी समुदायासोबत प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव असलेल्या उमेदवारांनाही विशेष प्राधान्य राहील. उमेदवारांना मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह २५ मे २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा, जिल्हा यवतमाळ येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे प्रकल्प कार्यालयाव्दा कळवण्यात आले आहे.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात 52 उमेदवारांची प्राथमिक निवड




प्रतिनिधी २० मे

**अमरावती :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटरच्या वतीने आज, १९ मे रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा पार पडला. जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या कार्यालयात सकाळी १० वाजता घेण्यात आला. मेळाव्यात प्रत्यक्ष मुलाखतींमधून ५२ नोकरी इच्छुक उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.

उद्घाटक म्हणून कौशल्य विकास विभागाचे उपायुक्त दत्तात्रय ठाकरे उपस्थित होते. सहायक आयुक्त श्रीमती प्रांजली बारस्कर यांनी अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी प्रमुख उद्योजक म्हणून जाधव गियर्सचे प्रतिनिधी रोहित प्रांजळे, जिनस इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. ली. चे प्रतिक इंगोले, प्रेसिजन मेपिंगचे सचिन निचले, टॅलेन्टकॉर्प सोल्यूशन प्रा. ली. नागपूरच्या करिष्मा पासवान आणि शिखर एज्युकेअर अमरावतीचे आयुष अग्रवाल उपस्थित होते.

उपायुक्त . ठाकरे यांनी युवकांनी केवळ रोजगार मिळविणारे न होता, स्वतःचे उद्योग सुरू करून रोजगार देणारे उद्योजक व्हावे, असे आवाहन केले. सहायक आयुक्त श्रीमती बारस्कर यांनी प्रास्ताविकातून प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेचे महत्त्व पटवून दिले.

ही योजना देशातील नामांकित कंपन्यांमध्ये प्रवेश मिळविण्याची सुवर्णसंधी आणि एक उत्तम मार्ग असल्याचे सांगितले.

मेळाव्यासाठी ऑनलाइन, ऑफलाइन माध्यमातून १६४ उमेदवारांनी नोंदणी केली. त्यापैकी १२४ उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींसमोर मुलाखती दिल्या. सर्व खाजगी आस्थापनांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांची योग्यता तपासून ५२ उमेदवारांची प्राथमिक निवड केली. सोनाली भोगे यांनी सूत्रसंचालन केले, पंकज कचरे यांनी आभार मानले.

## महाटेट 2025 परीक्षेचे प्रमाणपत्र वितरण सुरू

प्रतिनिधी २० मे

**अमरावती :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रमाणपत्र वितरण दि. १९ मे पासून सुरू करण्यात आले आहे. पात्र उमेदवारांना हे प्रमाणपत्र ८ जून पर्यंत कार्यालयीन वेळेत प्राप्त करून घेता येणार आहे.

उमेदवारांनी प्रमाणपत्र घेण्यासाठी अर्ज सादर केल्यानंतर त्यांच्या कागदपत्रांची रीतसर तपासणी केली जाईल. त्यानंतर तीन दिवसांनी उमेदवारांना प्रमाणपत्र वितरित केले जाईल. प्रमाणपत्र घेण्यासाठी येताना उमेदवारांनी मूळ कागदपत्रांसह छायांकित प्रती आणणे आवश्यक आहे.

उमेदवारांनी प्रमाणपत्र घेण्यासाठी येताना महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रवेशपत्राची प्रत, महाटेट परीक्षेच्या गुणपत्रिकेची प्रत, डी. टी. एड. किंवा बी. एड. उत्तीर्ण गुणपत्रिका अथवा प्रमाणपत्र, राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी जात प्रमाणपत्र, लागू असल्यास दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र, माजी सैनिक असल्यास त्याबाबतचा अधिकृत पुरावा, आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा निवडणूक ओळखपत्र यांपैकी कोणतेही एक ओळखपत्र, या कागदपत्रांच्या प्रती आणि मूळ कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे, असे प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी कळविले आहे.

## काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुधाकर भारसाकळे यांचा राजीनामा

### शिवसेना शिंदे गटात जाण्याची शक्यता; काँग्रेसला मोठा धक्का

प्रतिनिधी २० मे

**दर्यापूर :** काँग्रेसचे दर्यापूर तालुका अध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा काल पक्षश्रेष्ठींकडे सादर केला असून यामुळे काँग्रेस पक्षाला दर्यापूर तालुक्यात मोठा धक्का बसला आहे. सुधाकर पाटील भारसाकळे यांनी अद्याप कुठल्या पक्षात आपण जाणार हे स्पष्ट केले नसले तरी ते शिवसेना शिंदे गटात जातील अशी राजकीय चर्चा दर्यापुरात रंगू लागली आहे.

सुधाकर पाटील भारसाकळे यांची काँग्रेस पक्षावर मोठी पकड होती. ते सहकार नेता म्हणूनही उदयास आले होते. ते जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक ही आहेत. अमरावती जिल्ह्याच्या



पक्षातीलच काही वरिष्ठांसोबत त्यांचे अलीकडच्या काळात जमत नसल्याने त्यांनी हे राजीनामाचे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. काही दिवसापूर्वीच काँग्रेसचे नेते बाळासाहेब हिंगणीकर यांनीही काँग्रेस पक्षातून राजीनामा देऊन भाजपात प्रवेश केला होता. दोन महिन्यात काँग्रेसला दोन मोठे नेते सोडून गेल्याने काँग्रेसला दर्यापूर तालुक्यात मोठा धक्का मानला जात आहे. सुधाकर पाटील भारसाकळे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष असताना त्यांना काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी राजीनामा द्यायला लावला होता.

त्यांनी राजीनामा दिल्यानंतर काँग्रेस गटाचा अध्यक्ष न होता, राजकीय खेळी करून आमदार बच्चू कडू अध्यक्ष झाले होते. तेव्हापासूनच दर्यापूर तालुक्याचे राजकारणातही ठिणगी पडली होती. जिल्हा काँग्रेसच्या नेत्यांच्या या कार्यप्रणालीला कंटाळून सुधाकर पाटील भारसाकळे यांनी राजीनामा दिल्याचे राजकीय जाणकार बोलत आहेत.

आमदार प्रकाश पाटील भारसाकळे शिवसेनेत असताना आमदार भारसाकळे यांनी शिवसेनेला शेवटचा जय महाराष्ट्र ठोकल्यानंतर ते काँग्रेस पक्षात गेले होते.

# आर्चरी वर्ल्ड कपमध्ये सुवर्ण भेद करणाऱ्या कुमकुम मोहोडचा जिल्हाधिकाऱ्यांकडून सत्कार

प्रतिनिधी २० मे

**अमरावती :** नुकत्याच शांघाय, चीन येथे पार पडलेल्या 'वर्ल्ड आर्चरी चॅम्पीयनशिप' स्टेज २ स्पर्धेत अमरावतीची आंतरराष्ट्रीय तिरंदाज कुमकुम मोहोड हिने भारतीय महिला संघाला सुवर्णपदक मिळवून दिले आहे. या यशाबद्दल जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते कुमकुमचा शाल आणि पुस्तक देऊन गौरव करण्यात आला. यावेळी जिल्हा प्रशासनाकडून खेळाडूंना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

जागतिक स्पर्धेत भारत आणि यजमान चीन यांच्यातील अंतिम सामना ४-४ असा बरोबरीने सुटला होता. त्यानंतरच्या 'शूट-ऑफ'मध्ये




कुमकुमने अचूक लक्ष्यभेद करीत चीनला पराभूत केले. या कामगिरीने भारतीय महिला संघाने ५ वर्षांनंतर पहिले सांघिक सुवर्णपदक पटकाविले. उपांत्य फेरीतही भारतीय संघाने १० वेळा ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकणाऱ्या दक्षिण कोरियाच्या संघाला पराभूत केले. या सुवर्णविजेत्या भारतीय संघात कुमकुम मोहोडसह अंकिता भगत आणि ४ वेळची ऑलिम्पियन दीपिका कुमारी यांचा समावेश होता.

कुमकुम ही गेल्या ९ वर्षांपासून अमरावती जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, 'खेलो इंडिया' आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या शूटिंग रेंजवर आंतरराष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक प्रफुल्ल डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे. अत्यंत कमी वयाची असलेली कुमकुम सध्या फॉर्मात असून, तिची आगामी जूनच्या दुसऱ्या आठवड्यात तुर्की येथे होणाऱ्या वर्ल्ड कप स्टेज ०३, स्पेन (माद्रिद) येथील वर्ल्ड कप स्टेज ४ आणि सप्टेंबरमध्ये जपान येथे होणाऱ्या आशियाई गेम्ससाठी भारतीय संघात निवड झाली आहे. कुमकुमसोबतच अमरावतीचा यशदीप भोगे याची देखील आशियाई गेम्ससाठी निवड झाली आहे. कुमकुमच्या यशाचे कौतुक करताना जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी कुमकुमची लहान वयातील ही कामगिरी पाहता, ती २०२८ मध्ये लॉस एंजेलिस (अमेरिका) येथे होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत निश्चितच भारताचे प्रतिनिधित्व करेल आणि देशाचे नाव लौकिक वाढवेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, अनिल इंगळे, क्रीडा मार्गदर्शक. प्रफुल्ल डांगे उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

बुधवार दि २० मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






# नगर पालिका भ्रष्टाचाराने आखडली...

# शहरातील नालेसफाई रखडली!

## *नाल्याबनल्या गटारगंगा * जिकडे तिकडे चोहीकडे घाणच घाण

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

पावसाळ्यापुर्वी शहरातील नाल्यांची साफसफाई करण्यात आली तर पुराच्या धोक्यापासून नाल्याकाठील रहिवाशांचा बचाव होतो. मात्र पालिकेने अद्यापही शहरातील नाल्यांची साफसफाई करण्याची मोहिम हाती घेतली नसल्याने बालाजी मंदिर मागील भाग, डोहर पुरा, गवळीपुरा, गोंदेश्वर, विटाळी तलाव अकोला नाका, शिवाजी शाळेमागील भाग, नालसापुरा, गोपाल टॉकीज, गोंदेश्वर, आदि परिसरातील नागरिकांनी नाले साफसफाई करण्याची मागणी केली आहे. मात्र, नाली सफाई नसल्याने नाल्या गटारगंगा बनल्या असून शहरात नाली भवताल जिकडे तिकडे चौहीकडे घाणच घाण पसरली आहे तर नगर पालिका ही भ्रष्टाचाराने आखडली असून नाली सफाई रखडली आहे. तर मान्सुन पुर्व पावसाने हजेरी लावल्याने शहरात रखडलेली नाली सफाई आता केव्हा करणार असा सवाल उपस्थित होतो. नाले सफाई रखडल्यामुळे घाणचघाण पसरली आहे.



मागील वर्षी पहिल्याच पावसाने कहर करुन नाल्याकाठी राहत असलेल्या अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने घरांची पडझड झाली होती. याच बरोबर बहुतांश गोरगरिब नागरिकांच्या घरातील भांडेकुंडी पावसात वाहून गेली होती. गवळीपुरा, सिंदखाना, खाटीकपुरा, डोहरपुरा, विटाळी तलाव या परिसरात पावसाने कहर केला होता. बऱ्याच नागरिकांना त्या वेळी न. प. शाळांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने आश्रय देण्यात आला होता.

दरवर्षी पावसाळा लागण्यापुर्वीच नाले सफाई मोहिम हाती घेण्यासाठी नगर परिषद प्रयत्न करीत असते. मात्र यावर्षी अद्यापही पालिकेने शहरानजिकच्या नाले सफाई मोहिम सुरु केली नाही. खरे पाहता पावसाळा सुरु झालेला आहे. जून महिना असल्याने केव्हाही पाऊस येऊन नाल्यांना पुर येऊ शकतो. यासाठी पालिकेच्या आरोग्य विभागाने लक्ष देण्याची मागणी शहरातील नागरिकांनी केली आहे.

इनामदारपुरा, मंगळवारीवेश, लोखंडी पुल, शिवाजी चौक, भवानी नगर, डोहरपुरा, देवपेठ शाळेजवळील भाग, विटाळी तलाव, गवळीपुरा, सिंदखाना, खाटीकपुरा, शिवाजी शाळेमाघून , नालसापुरा, गोपाल टॉकीज, काळेफाईल, गोंदेश्वर अकोला नाका परिसरातून आदि परिसरात येणाऱ्या नाल्यांची साफसफाई करणे गरजेचे आहे. याबाबत नगर पालिकेने त्वरीत लक्ष द्यावे अन्यथा पावसाळा आल्यानंतर नेहमीप्रमाणेच नगर परिषद नाले साफसफाई मोहिम हाती घेईन. मात्र तोपर्यंत नाल्यांच्या काठांवर वसलेल्या गोरगरिबांची घरे वाहून गेल्याशिवाय राहणार नाही.

## सुविधांचा अभाव,कसा होणार निभाव...

विकासाच्या नावावर हजारो कोटीचे कामे करूनही शहर भकास झाले आहे. नागरिकांना मुलभूत समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे. चार वेळा कागदोपत्री रस्ते करूनही नागरिकांचे जीवनच खड्ड्यात गेले आहे. घंटा गाडीच्या तंट्याने जीवनाचा कचरा झाला आहे. आठ दिवसाआड गढुळ पाण्याने आरोग्य धोक्यात आले आहे. शहरात सध्या ही खूप प्रश्न आहेत. गुंठेवारीची खरेदी विक्री बंद आहे. सिग्नलही बंद अवस्थेत आहेत. भूमीगत गटार योजना गटारातच गेली आहे. भ्रष्टाचाराचे अपूर्ण नाट्यगृह, सिटी हॉल, नागरिकांकडून हजारो रुपयांची पठाणी वसुली करून त्यांच्या माथी मारलेल्या नळाच्या मिटरला आठवड्यातून एक दिवस येणारे दूषित पाणी, ओसाड झालेले महात्मा फुले व लोकमान्य टिळक गार्डन, संपूर्ण शहरातील स्वच्छतागृहाची अवस्था, धन धाग्ड्यांची असलेली अतिक्रमण, असे अनेक विषय पुढाकाराने घेवून राजकारण्याने श्रेयवादासाठी का होईना अपूर्ण राहीलेले कामे पुर्ण करावे आणि शहरासोबतच जिल्ह्याचा विकासाचा मार्ग काढावा अशी मागणी होत आहे. निवडणुकीत नागरिकांना चकाचक रस्ते, २४ तास पाणी, भूमिगत गटार योजना, घरकूल, असे अनेक आश्वासनाचे गांजर देवून विजयाची पुंगी वाजविली असली तरी कुठे झाला विकास, शहर झाले भकास, नगरसेवक व लोकप्रतिनिधी झकास अशी परिस्थिती वाशीम शहरासह जिल्ह्यातील इतर शहरांचीही झाली आहे. तर कचऱ्या कधीच प्रक्रिया न करता कचरा खाल्याने व जाळल्याने नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे.

## थोडक्यात

### यावर्डीचे ११ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण



●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

पूर्व माध्यमिक शिष्यवृती परीक्षेचा ऑनलाईन निकाल दिनांक १८ मे रोजी करण्यात आला आहे. त्यामध्ये बाबासाहेब धाबेकर माध्य. विद्यालय यावर्डीच्या इयत्ता आठवीचे ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कु. रिद्धी गुणवंत राऊत व कु. तनु सुनील ठाकरे यांनी ३०० पैकी २०० गुण प्राप्त करून विद्यालयातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. तसेच १९६ गुण प्राप्त करणारा प्रज्वल राजेश राऊत हा विद्यालयातून दुसरा आला आहे तर १७८ गुण प्राप्त करून कु. पायल ईश्वर मडामे विद्यालयातून तिसरी आली आहे. तसेच इतर यशवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. रचना राहुल वासे १७० गुण, कु. कल्यानी राजेश कापसे १६८ गुण, कु. प्रियांशी प्रमोद मानवटकर १५८ गुण, अजिंक्य गजानन चव्हाण १५० गुण, संस्कृती अतुल करडे १४८ गुण, हर्षा गोपाल सराफ १४४ गुण व स्नेहल सचिन वासे १४२ गुण मिळवून उत्तीर्ण झालेले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेण मुख्याध्यापक विजय देविदास भड, शिक्षक राजेश शेंडेकर, कु. शालीनी ओलिवकर, गोपाल काकड, अनिल हजारे यांना दिले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्था अध्यक्ष योगेश केशवराव खोपे, सचिव हरिदास गंद्रे, संचालक देविदास काळबांडे, वामनराव घोडे, निलेश खोपे, मुख्याध्यापक विजय भड व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच गावकरी मंडळी यांनी केले आहे.

### महिला सुरक्षा, बालसंरक्षणासाठी यंत्रणांनी अधिक संवेदनशीलतेने काम करा - जिल्हाधिकारी

**वाशीम :** जिल्ह्यात महिला व बालकांच्या संरक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. महिलांवरील अत्याचार, बालविवाह, कौटुंबिक हिंसाचार तसेच बालकांशी संबंधित प्रकरणांमध्ये अत्यंत संवेदनशीलतेने व तत्परतेने कार्यवाही करण्यात यावी. विविध विभागांनी परस्पर समन्वयातून महिला सक्षमीकरण आणि बाल संरक्षणासाठी अधिक परिणामकारक उपक्रम राबवावेत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

# ३५० दिव्यांगांना मोफत आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पाय बसवून मिळणार!

## *दिव्यांग केंद्र पुणे यांच्या वतीने १४ जुन रोजी मोजमाप शिबीर *जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी लाभ घेण्याचे आवाहन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

गेल इंडीया लिमिटेड यांच्या सीएसआर सहाय्यता अंतर्गत व भारत विकास परिषदेच्या दिव्यांग केंद्र पुणे यांच्या वतीने आणि श्री चिंतामणेश्वर मठ संस्था, वीरशैव लिंगायत समाज वाशिम जिल्हा यासोबतच आमदार श्याम खोडे यांच्या सहयोगातून स्थानिक स्वागत लॉन येथे येत्या १४ जुन रोजी दिव्यांग बांधवांसाठी कृत्रिम हात, पाय व कॅलिपर मोजमाप शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरामध्ये ३५० दिव्यांगांना मोफत आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पाय बसवून देण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच फोनव्दारे पुर्वनोंदणी आवश्यक असून या शिबीराचा लाभ जिल्हयातील दिव्यांग बांधवांनी घेण्याचे आवाहन दिव्यांग केंद्राचे प्रमुख विनय खटावकर यांनी पत्रपरिषदेतुन केले.

मंगळवार, १९ मे रोजी स्थानिक विश्रामगृहात झालेल्या पत्रपरिषदेत आमदार श्याम खोडे, गेल इंडीयाचे संचालक प्रा.डॉ. रविकांत कोल्हे, मोहन बोरगांवकर आदींची उपस्थिती होती. विश्वस्त व दिव्यांग केंद्रप्रमुख विनय खटावकर पुणे यांनी शिबिराच्या संपूर्ण नियोजनाची आणि आधुनिक मॉडयूलर पायाविषयी पत्रकारांना माहिती दिली. ते पुढे म्हणाले की, भारत विकास परिषद ही सेवा व संस्कार क्षेत्रात निस्वार्थपणे काम करणारी राष्ट्रव्यापी संघटना आहे.



दिव्यांगाना कृत्रिम अवयव बसविणे हा प्रमुख राष्ट्रव्यापी सेवा प्रकल्प आहे. भारतातील १३ दिव्यांग केंद्रांपैकी महाराष्ट्रातील कायमस्वरूपी पुणे येथील दिव्यांग केंद्र गेल्या २५ वर्षापासून अखंड कार्यरत आहे. भारत विकास परिषदेच्या महाराष्ट्र स्तरावर मोफत दिव्यांग शिबीर घेणाऱ्या दिव्यांग पुनर्वसन केंद्र पुणे तर्फे दरवर्षी सुमारे ५ हजार दिव्यांगांना मोफत कृत्रिम पाय, हात व कॅलिपर बसविण्यात येतात. तसेच सदर दिव्यांग केंद्रातर्फे रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त रा.स्व. संघाचे सरसंघ चालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत एप्रिल २०२५ मध्ये एकाच शिबिरात ८९२ दिव्यांगांना कृत्रिम पाय बसवून जागतिक विक्रम केला आहे. त्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. गेल इंडिया लि. यांच्या सी.एस.आर निधीतून गेली दोन वर्षे मोफत दिव्यांग शिबिरे अमरावती व अकोला येथे आयोजित करण्यात आली होती. असेच मोफत दिव्यांग शिबिर या वर्षी सुद्धा वाशीम येथे घेण्यात येत असल्याची माहिती खटावकर यांनी दिली. पुढे बोलतांना ते म्हणाले की, आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पायाची बाजारात रु. ५० हजारापेक्षा जास्त किंमत असून असे कृत्रिम पाय ह्या शिबिरात ३५० दिव्यांगांना मोफत देणार आहोत.

परंपरागत जयपूर फूटपेक्षा हे आधुनिक मॉड्यूलर कृत्रिम पाय ऑटोफोल्ड असून वजनाने हलके आहेत. आधुनिक कृत्रिम मॉड्यूलर पाय बसविल्यानंतर दिव्यांग व्यक्ती चालणे, पळणे, पोहणे, उडी मारणे, वाहन चालविणे व शेती कामे इ. प्रकारच्या दैनंदिन क्रिया करू शकतात. त्याबाबत तज्ञांमार्फत त्यांना मार्गदर्शनही केले जात असल्याची माहिती खटावकर यांनी देतांना दिव्यांगांनी ९६५७३४५५४३ व ९८२३१०२८६२ या क्रमांकावर तसेच अकोला अर्बन सह. बँक, वाशीम शाखा, सिंधी कॉलोनी, पाटणी चौकाजवळ येथे प्रत्यक्ष संपर्क करुन नोंदणी करण्याचे आवाहन केले. आपल्या मार्गदर्शनरपर भाषणात जास्तीत जास्त दिव्यांगांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार श्याम खोडे यांनी केले. चिंतामणेश्वर मठ संस्थान व वीरशैव लिंगायत समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते काशिनाथ लाहोरे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलचा मुबलक साठा उपलब्ध

### नागरिकांनी संयम बाळगून आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा पूर्णपणे सुरळीत असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. संयम बाळगून आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करावे असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे.



जिल्ह्यात इंधनाचा मुबलक साठा उपलब्ध असून, पेट्रोल पंपांवर गर्दी न करण्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. गेल्या काही दिवसांपासून इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ही माहिती दिली आहे. जिल्हा प्रशासन सर्व ऑईल कंपन्या आणि पेट्रोल पंप धारकांच्या सतत संपर्कात आहे. पेट्रोल पंपांवर इंधनाचे वाटप सुरळीत व्हावे आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनालाही आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. एकाच दिवसात पावणेआठ लाख लिटर इंधन दाखल जिल्ह्यात आज (दि. १९ मे) विविध ऑईल कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात इंधनाचा पुरवठा झाला आहे. यामध्ये: IOCL कडून ५६ हजार लिटर पेट्रोल आणि २ लाख २ हजार लिटर डिझेल. BPCL कडून ४५ हजार लिटर पेट्रोल आणि २ लाख ३० हजार लिटर डिझेल. प्ज्ण्थ कडून ६६ हजार लिटर पेट्रोल आणि १ लाख ७५ हजार लिटर डिझेल. जिल्ह्यात आज एकाच दिवसात एकूण १ लाख ६७ हजार लिटर पेट्रोल आणि ६ लाख ७ हजार लिटर डिझेलचा साठा प्राप्त झाला आहे. तसेच दररोज असाच इंधनसाठा जिल्ह्याला प्राप्त होणार आहे. अतिरिक्त खरेदी टाळा; प्रशासनाचे आवाहन कंपन्यांकडून दररोज याच पद्धतीने इंधनाचा पुरवठा होणार असल्याचे पुरवठा शाखेने सांगितले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता, केवळ आवश्यकतेनुसारच पेट्रोल-डिझेल खरेदी करावे. पंपांवर अनावश्यक गर्दी करू नये ,प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# खोट्या कॉलने पोलिसांची धावपळ!

## *केला ११२ डायल, गैरवापर करणाऱ्यावर गुन्हा दाखल *शिरपूर पोलीस स्टेशन हद्दीतील प्रकार

●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या एका गावातून डायल ११२ वर खोटी माहिती देऊन पोलिस यंत्रणेची दिशाभूल करणाऱ्या एका इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शासनाने जनतेला आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदत मिळावी या उद्देशाने डायल ११२ हा प्रकल्प सुरू केला आहे. या अंतर्गत नागरिकांना वेळेत सेवा पुरविता यावी यासाठी शिरपूर पोलीस स्टेशन येथे नियमितपणे डायल ११२ साठी एक वाहन व एक पोलीस अंमलदार यांचे कर्तव्य नेमण्यात आले आहे. मात्र यांना खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल केल्याप्रकरणी शिरपूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा करण्यात आला आहे. दि. १९ मे २०२६ रोजी डायल ११२ वर एका कॉलरने ग्राम नावली येथे दोन गायी व एक बैल वाहनामध्ये टाकून कत्तलखान्याकडे नेत असल्याची माहिती दिली. या माहितीच्या आधारे डायल ११२ वरील कर्तव्यावर असलेले पोलीस अंमलदार पो.कॉ./२२१ नागेश देवकर हे तात्काळ शासकीय वाहन क्रमांक एमएच १२ टीडी ७८३८ ने पोलीस स्टाफसह घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पोहोचल्यानंतर संबंधित कॉलरची प्रत्यक्ष भेट घेऊन माहिती विचारली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली.



> डायल ११२ ही सेवा जनतेच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. नागरिकांनी कोणतीही माहिती देताना तिची सत्यता पडताळूनच माहिती द्यावी. खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. आपत्कालीन सेवांचा गैरवापर टाळून नागरिकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे.
>
> **केशव वाघ,** पोलीस निरीक्षक, शिरपूर पोलीस स्टेशन

त्यानंतर पोलिसांनी गावातील सरपंच यांच्याकडे चौकशी केली असता गावात अशी कोणतीही घटना घडलेली नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच संबंधित व्यक्तीने पोलिसांना खोटी माहिती दिल्याचेही निष्पन्न झाले. याप्रकरणी प्रतापकुमार अर्जुन बाजड वय ३६, रा. नावली ता. रिसोड जि. वाशिम याने हेतुपुरस्सर लोकसेवकास खोटी माहिती देऊन दिशाभूल केल्याचे उघड झाल्याने त्याच्याविरुद्ध शिरपूर पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमांक २२७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २१७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, डायल ११२ ही आपत्कालीन सेवा असून तिचा गैरवापर करू नये. खोटी माहिती देणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

# विद्याभारती आचार्य प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ!

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

विद्याभारती विदर्भ प्रांताचा आचार्य प्रशिक्षण वर्ग रेखाताई राष्ट्रीय विद्यालय वाशिम येथे मंगळवार दिनांक १९/५/२०२६ ते शुक्रवार दिनांक २९/५/२०२६ दरम्यान होणार आहे. या आचार्य प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ १९/५/२०२६ रोजी वाशीम जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी श्रीमती मंगलताई धुपे यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या भारती विदर्भ प्रांत अध्यक्ष अभियंता श्री. सचिनजी जोशी, अकोला होते. प्रमुख उपस्थिती मध्ये विद्या भारती विदर्भ प्रांत उपाध्यक्ष विधिज्ञ श्री. सत्यानंदजी कांबळे आणि विद्या भारती वाशीम जिल्हाध्यक्ष प्रा. अनिलजी धुमकेकर होते.








प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक आणि विद्या भारती विदर्भ देवगिरी प्रांताचे संघटन मंत्री मा. शैलेशजी जोशी होते. दीपप्रज्वलन आणि वंदनेने कार्यक्रम प्रारंभ झाला. प्रमुख वक्ते श्री. शैलेशजी जोशी यांनी विद्या भारती अखिल भारतीय शिक्षा संस्थानचा परिचय आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने आचार्य प्रशिक्षण वर्गात होणारे उपक्रम याची माहिती दिली. उद्घाटक श्रीमती मंगल धुपे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर निवासी आचार्य प्रशिक्षण वर्गाचे कौतुक करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वर्ग संचालिका श्रीमती निर्मलाताई महाजन यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. अनिल धुमकेकर यांनी केले. वर्गाच्या संचालिका सौ. अनुपमाताई वालदूरकर ताई यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला विद्या भारती विदर्भ प्रांत उपाध्यक्ष श्रीमती प्रांजलीताई जोशी, मंत्री रोशनजी आगरकर, विदर्भ प्रांत सहमंत्री प्रा. दिलीपजी जोशी, विदर्भ प्रांत सहमंत्री रणदीप बिसणे , सुभाषजी, प्रा. रमेशजी आरु, प्रा. श्रीकांतजी जोशी यांची विशेष उपस्थिती होती. या आचार्य प्रशिक्षण वर्गासाठी संपूर्ण विदर्भातून आचार्य आले असून दहा दिवस पर्यंत सकाळी साडेचार अग्निहोत्राने प्रारंभ होऊन रात्री दहा पर्यंत शैक्षणिक विषयांवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर चर्चा, मार्गदर्शन, संवाद होणार आहे. सामूहिक वंदे मातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली.

## एचएसआरपी बसविण्यासाठी वाहनधारकांना मोठी मुदतवाढ; आता ३० जूनपर्यंत संधी

### जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट अनिवार्य, अधिकृत केंद्रांवरूनच नंबर प्लेट बसवण्याचे आवाहन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

राज्यातील लाखो वाहनधारकांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी आहे. वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एंइ) बसविण्यासाठी राज्य शासनाने अखेर मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. परिवहन विभागाने जाहीर केलेल्या नवीन आदेशानुसार, आता वाहनधारकांना ३० जून २०२६ पर्यंत एचएसआरपी बसविण्याची अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. या विहित कालावधीत सर्व वाहनधारकांनी आपल्या वाहनांवर एचएसआरपी बसवून घ्यावी, असे आवाहन परिवहन विभागाने केले आहे.

राज्य शासनाने यापूर्वी वेळोवेळी जारी केलेल्या आदेशांनुसार, राज्यातील सर्व जुन्या वाहनांवर एचएसआरपी (एंइ) बसवणे कायदेशीररित्या बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, अद्यापही अनेक वाहनधारकांकडून ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली नसल्याने प्रशासनाने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

मुदत संपत आल्याने वाहनधारकांमध्ये संभ्रम आणि केंद्रांवर गर्दीची शक्यता निर्माण झाली होती, या निर्णयामुळे आता मोठा दिलासा मिळाला आहे.

# अंत्रीकोळी येथून दोन पिस्तूल, 92 काडतुसे जप्त

कारवाईत रायपूर पोलिसांनी जप्त केलेले दोन पिस्तुल व काडतूस
रायपूर पोलिसांची अचूक माहितीवर एटीएसची कारवाई

प्रतिनिधी २० मे

**चिखली :** बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील अंत्रीकोळी गावात रायपूर पोलिस आणि दहशतवाद? विरोधी पथकाने (अकोला) टाकलेल्या संयुक्त धाडीत अवैध शस्त्रास्त्रांचा साठा उघडकीस आला आहे.

दोन देशी बनावटीच्या पिस्तूल, तब्बल ९२ जिवंत काडतुसे, मॅगझिन, चाकू आणि एका वाहनासह सात लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे जिल्ह्यात अवैध शस्त्र पुरवठ्याचे मोठे रॅकेट सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, मुख्य आरोपी वर्धा जिल्ह्यातील असून, त्याने जळगाव मधून ही शस्त्रे विकत घेतल्याची प्राथमिक माहिती तपासात पुढे आली आहे.



आरोपी अंत्री कोळी येथे नातेवाइकांच्या घरी थांबले असल्याची गुप्त माहिती रायपूर पोलिसांना मिळाली.होती. त्यानंतर एटीएस अकोला आणि स्थानिक पोलिसांनी गोपनीय पद्धतीने सापळा रचत धाड टाकली.

या धाडीत दोन देशी पिस्तूल, चार मॅगझिन, ९२ जिवंत काडतुसे, दोन वापरलेली काडतुसे, लोखंडी चाकू, आयफोन फोन व एक चारचाकी वाहन जप्त करण्यात आले. पोलिसांनी शुभम सागर पवार (वर्धा), रुपेश शिंदे आणि रोहेल शिंदे (दोघेही रा. जळगाव) या तिघांना अटक केली आहे. शस्त्रांची विक्री नेमकी कुठे आणि कोणासाठी होणार होती? याचा शोध आता एटीएसचे पथक घेत आहे.

# एसटी फेऱ्यांतील कपातीमुळे ग्रामीण भागात खासगी प्रवासी वाहनधारकांची मनमानी !

प्रतिनिधी २० मे

## ◆ अनियमित बससेवेचा सर्वसामान्यांना फटका!



**खामगाव :** ग्रामीण भागातील एसटी बसफेऱ्यां मध्ये झालेल्या कपातीचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. अनेक मार्गावर बससेवा अनियमित झाल्याने खासगी वाहतुकीवर अवलंबून राहण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे. परिणामी खासगी वाहनधारकांची मनमानी सुरू असून, वाढीव भाडे आकारले जात असल्याने ग्रामीण नागरिकांचा आर्थिक ताण वाढला आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये महत्त्वाच्या बसफेऱ्या कमी झाल्याने शेतकरी, कामगार तसेच महिला प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. वेळेवर वाहन उपलब्ध होत नसल्याने नागरिकांना कामानिमित्त शहरात पोहोचण्यासाठी खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. विशेषतः दुर्गम भागात परिस्थिती गंभीर बनली आहे.आरोग्य तपासणी किंवा उपचारासाठी शहरात येणाऱ्या रुग्णांना वाहतु की अभावी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना तासन्तास वाहनाची प्रतीक्षा करावी लागत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.एसटीच्या फेऱ्या कमी झाल्याने रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. मात्र, वाढीव प्रवास खर्चामुळे दिवसाच्या मजुरीतील मोठा हिस्सा वाहतुकीवर खर्च होत असल्याने आर्थिक अडचणी वाढल्या आहेत.सायंकाळच्या बस फेऱ्यांमध्ये कपात झाल्याने ग्रामीण भागातील महिलांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत आहे. काही ठिकाणी उशिरापर्यंत वाहन उपलब्ध होत नसल्याने सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होत असल्याची भावना महिला प्रवाशांनी व्यक्त केली आहे.

# सिंदखेड राजाच्या ऐतिहासिक राजवाड्यापासून 'घर गणना' मोहिमेचा शुभारंभ

प्रतिनिधी २० मे

**सिंदखेडराजा :** ऐतिहासिक वारसा लाभलेल्या सिंदखेडराजा शहरात कालपासून घर गणनेच्या मोहिमेला मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली. या मोहिमेचा शुभारंभ राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या ऐतिहासिक राजवाड्यापासून करण्यात आला, ज्यामुळे या शासकीय प्रक्रियेला एक विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

सिंदखेड राजा तालुक्यात उपविभागीय अधिकारी प्राध्यापक संजय खडसे, तहसीलदार अजित ड्युटी मुख्याधिकारी आशिष बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली या जनगणनेचे काम अत्यंत चोख सुरू आहे. यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून सुजित चव्हाण संगणक अभियंता तथा जनगणना (अतिरिक्त प्रभार अधिकारी) उपस्थित होते. त्यांच्या हस्ते आणि मार्गदर्शनाखाली मोहिमेचे पहिले पाऊल टाकण्यात आले. यावेळी प्रगणक म्हणून कवाणकर यांनी प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात केली. जनगणनेची प्रक्रिया पारदर्शक आणि अचूक व्हावी यासाठी पर्यवेक्षक म्हणून दसरे आणि रणजित मेहेत्रे यांनी जबाबदारी स्वीकारली आहे. त्यांच्या देखरेखीखाली शहरातील प्रत्येक घराची नोंदणी केली जाणार आहे. या महत्त्वपूर्ण प्रसंगी महसूल आणि शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने भोसले, सलीम, म्हस्के, तिडके, सावरकर यांची उपस्थिती लक्षणीय होती. शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि शहराच्या नियोजनासाठी ही घर गणना अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. नागरिकांनी प्रगणकांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी केले आहे. ऐतिहासिक वास्तूतून सुरू झालेली ही मोहीम संपूर्ण तालुक्यात टप्प्याटप्प्याने राबवली जाणार आहे.

# पेट्रोल-डिझेल टंचाईने चिखलीकर हैराण

प्रतिनिधी २० मे

**चिखली :** चिखली शहर व परिसरात पेट्रोल-डिझेलच्या टंचाईमुळे नागरिकांचे मोठे हाल होत असून इंधन मिळवण्यासाठी पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. काही ठिकाणी या रांगांचे अंतर तब्बल एक किलोमीटरपर्यंत पोहोचल्याचे चित्र दिसून आले. इंधनासाठी एकाच वेळी मोठ्या प्रमाणात नागरिक गर्दी करत असल्याने अनेक पेट्रोल पंपांवर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले असून ग्राहकां मध्ये वादावादीच्या घटनाही घडत आहेत.

चिखली-शहर व परिसरात जवळपास १० पेट्रोल पंप असले तरी केवळ २ ते ३ पंपांवरच अधूनमधून पेट्रोल व डिझेल उपलब्ध होत असल्याने नागरिकांची मोठी गर्दी याच पंपांवर होत आहे. वाहनांना नंबर लावण्यावरून अनेक ठिकाणी नागरिकांमध्ये शाब्दिक वाद होत असून काही ठिकाणी पेट्रोल पंप कर्मचाऱ्यांनाही नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. शहरातील एका पेट्रोल पंपावर परिस्थिती इतकी तणावपूर्ण झाली की, वाद मिटवण्यासाठी तहसीलदारांना स्वतः घटनास्थळी जाऊन हस्तक्षेप करावा लागला. चिखली-जालना रोडवरील महाबीज परिसरातील रेणुका पेट्रोल पंपावर जवळपास अर्धा किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले. तसेच एकर फाट्यावरील पेट्रोल पंपावरही पेट्रोलसाठी वाहनांची मोठी गर्दी झाली होती. दरम्यान, पेरणीपूर्व मशागतीचे दिवस जवळ आल्याने शेतकऱ्यांची चिंता अधिक वाढली आहे. १५ मे रोजी लग्नसराईची शेवटची तिथी झाल्यानंतर ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग लग्नसराई पाटोपून आता शेती कामाला लागलेला आहे. ट्रॅक्टर व शेतीच्या इतर यंत्रांसाठी डिझेलची गरज असल्याने शेतकरीही मोठ्या संख्येने रांगांमध्ये उभे असल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक मोटारसायकल चालकांनी पेट्रोल मिळेल. या आशेने आपली वाहने पेट्रोल पंपावरच उभी करून ठेवली आहेत. इंधन टंचाईमुळे दैनंदिन वाहतूक व्यवस्थेवर परिणाम झाला असून अनेकांचे दळणवळण विस्कळीत झाले आहे.

# वादाचे रूपांतर हाणामारीत; परस्परां विरुद्ध गुन्हे दाखल

प्रतिनिधी २० मे

**खामगाव :** शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बाळापूर फैल परिसरात किरकोळ कारणावरून दोन कुटुंबांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. याप्रकरणी दोन्ही पक्षांनी एकमेकांविरोधात तक्रारी दाखल केल्याने परस्परां विरुद्ध गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. पहिल्या प्रकरणात मुकेश गणपत दाभाडे (वय ३८, रा. खदान बालापूर फैल, खामगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या मुलीने आरोपींचा मुलगा घरी आल्याचे सांगितल्यानंतर ते संबंधितांना समजावून सांगण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपी ज्योती भारत मोरे व भारत मोरे यांनी लोखंडी - रॉडने मारहाण केली. तसेच हात व खांद्यावर चावा घेत शिवीगाळ केल्याचा आरोप फिर्यादी ने केला आहे. या तक्रारीवरून खामगाव शहर पोलिस ठाण्यात अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ३५२, ३५१ (२), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोहेकॉ विठ्ठल चव्हाण करीत आहेत. दरम्यान, दुसऱ्या प्रकरणात ज्योती भारत मोरे (३८, रा. बालापूर फैल, खामगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी मुकेश गणपत दाभाडे व मिलिंद गणपत दाभाडे यांनी त्यांच्या घरासमोर येऊन अश्लील शिवीगाळ करत धमक्या दिल्या.तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम २९६, ११५ (२), ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोहेकॉ रामेश्वर फासे करीत आहेत.या घटनेमुळे बाळापूर फैल परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

# बसस्थानक परिसरातून महिलेच्या पर्समधून सव्वा लाखांचे दागिने लंपास

प्रतिनिधी २० मे

**मलकापूर :** बसस्थानक परिसरात एका महिलेच्या पर्समधून अज्ञात चोरट्याने सुमारे १ लाख २१ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना रविवारी सायंकाळी घडली. याप्रकरणी मलकापूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी शिल्पा संजय पठठे (वय ३२), या १८ मे रोजी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास मलकापूर बसस्थानकावरून एमएच १४ एलएक्स ८३२८ या बसनने बुलडाणा येथे जाण्यासाठी मध्ये चढत होत्या. यावेळी गर्दीचा फायदा घेत चोरट्याने त्यांच्या पर्सची चेन उघडून पर्समधील सोन्याचे दागिने लंपास केले चोरीस गेलेल्या मालामध्ये १.५ तोळ्यांची छोटे गंठनची पोत किंमत ६० हजार रुपये, एक तोळ्यांची काळे मणी व सोन्याचे गोल मणी असलेली पोत किंमत ४० हजार रुपये तसेच ५.५ ग्रॅम वजनाचे कानातील टॉप किंमत २१ हजार रुपये असा एकूण १ लाख २१ हजार रुपयांचा मुद्देमाल असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन कौळासे करत आहेत. चोरट्यांमुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर मलकापूर बसस्थानक परिसरात अवघ्या १० ते १५ दिवसांच्या कालावधीत मंगळसूत्र चोरीसारख्या घटना घडत असल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः महिलांना लक्ष्य केले जात असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. वारंवार घटना घडूनही पोलिसांचा गुन्हेगारांवर अपेक्षित धाक दिसून येत नसल्याची चर्चा जनसामान्यात सुरू आहे. पोलिसांनी याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

# अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध कारवाईची शिवसेना (उबाठा) ची उपविभागीय अधिकारी, तहसिलदारांकडे मागणी

प्रतिनिधी २० मे

**मलकापुर :** तालुक्यातील भानगुरा शिवारातील शेतातून जाणाऱ्या रस्त्यात मुद्दाम खुणा टाकून शेतकऱ्यांचा वहिवाटीचा रस्ता बंद केला असून तो रस्ता मोकळा करून द्यावा तसेच रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध कारवाईची मागणी शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास, किसान सेना तालुकाप्रमुख महादेव पवार सह शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे, तहसीलदार समाधान सोनवणे यांच्या कडे आज दि.१९ मे २६ रोजी एका निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद केले आहे की भानगुरा शिवारातील विनोद विठ्ठल इंगळे व नितीन विठ्ठल इंगळे या दोघा भावांची गट नंबर २२४ मध्ये शेती आहे, या शेतातून दुसऱ्या शेतकऱ्यांना येण्या- जाण्या साठी स्वखुशीने इंगळे बंधुनी बैल जोडीचा रस्ता दिलेला आहे. शेजारील गट नंबर २२३ मधील शेतकरी मुकुंदा गोंडू बढे, रवींद्र गोंडू बढे दोन्ही रा.रुईखेडा ता.मुक्ताईनगर,ह.मु मुक्ताईनगर यांनी रस्ता बंद करून रस्त्यावर अतिक्रमण करून बेकायदेशीरपणे खुणा गाडल्या आहे तो रस्ता जबरदस्तीने बंद केला असून याबाबत त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला असता बढे बंधूंनी काही न ऐकता उलट शेतकऱ्यांना रस्ता देणाऱ्या इंगळेंना मारहाणीच्या धमक्या दिल्याने शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, शहर प्रमुख हरीदास गणबास, किसान सेना तालुकाप्रमुख महादेव पवार, विनोद विठ्ठल इंगळे, नितीन विठ्ठल इंगळे यांनी उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे, तहसीलदार समाधान सोनवणे यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांचा रस्ता अडविणाऱ्या मुकुंदा गोंडू बढे, रवींद्र गोंडू बढे यांच्यावर कारवाई करून शेत रस्ता मोकळा करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे निवेदनाच्या प्रती पोलीस निरीक्षक दसरखेड एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन, मंडळ अधिकारी, तलाठी यांना दिल्या आहे.

# स्वस्त धान्य दुकानांत पोहोचवला जातो निकृष्ट गहू!

## ◆ रेशन दुकानदार संघटनेची पुरवठा विभागाकडे तक्रार

प्रतिनिधी २० मे

**खामगाव :** शहरातील रेल्वे माल धक्क्या वरून रेशन दुकानांमध्ये भिजलेला व निकृष्ट दर्जाचा गहू पोहोचविला जात असल्याचा गंभीर आरोप रेशन दुकानदार संघटनेकडून करण्यात आला आहे. याप्रकरणी संघटनेने पुरवठा विभागाकडे लेखी तक्रार दाखल करून संबंधित प्रकाराची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

रेशन दुकानदार संघटनेने दिलेल्या तक्रारीनुसार, रेशन धान्याची थेट मालधक्क्या वरून वाहतूक करण्यास परवानगी देण्यात आली आहे; मात्र मालधक्क्या वरून रेशन दुकानांमध्ये पोहोचविण्यात येणारा गहू अत्यंत निकृष्ट दर्जाचा असून, तो भिजलेला व खराब अवस्थेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा प्रकारचा गहू ग्राहकांना वितरित करणे अयोग्य असल्याने संबंधित वाहतूक तातडीने थांबवावी आणि खराब गहू रेशन दुकानदारांना देऊ नये, अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली आहे. रेशन दुकानदार संघटनेने पुरवठा विभागाकडे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून थेट माल धक्क्या वरून पीडीएस वाहनां द्वारे होणारी वाहतूक तात्पुरती बंद करावी, तसेच निकृष्ट व खराब गव्हाचे वितरण तातडीने थांबवावे, अशी मागणी केली आहे. जेणेकरून दुकानदारांना लाभार्थ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागणार नसल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# पद्म. डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालयाचा 'ग्रँड अल्युमनी मीट 2026' मेळावा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी २० मे




**मलकापुर :** स्थानिक लोकसेवा बहुउद्देशीय मंडळ संचालित पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मलकापूर येथील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा 'ग्रँड अल्युमनी मीट २०२६' रविवार, १७ मे २०२६ रोजी पुण्यातील आकुर्डी येथील 'सीझन्स बँक्युएट' हॉलमध्ये अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. 'स्मृतींना उजाळा, नात्यांचे पुनरुज्जीवन' या ब्रीदवाक्याला सार्थ ठरवत माजी विद्यार्थ्यांनी या सोहळ्याला हजेरी लावली होती. या दिमाखदार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खर्चे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून दाणा टीएम४ च्या मॅनेजर योगिता सुशीर व कविता सुशीर, तसेच 'पिनॅकल इंडस्ट्रीज' चे डीजीएम मॅनेजर महादेव पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. महाविद्यालयाचे अध्यक्ष ज्ञानदेव पाटील आणि सचिव डॉ. अरविंद कोलते यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहू न शकल्याने व्हिडिओ क्लिपद्वारे विशेष संदेश पाठवून माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी आपल्या संदेशात विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे कौतुक केले व महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या मुख्य कमिटीचे आयक्यूएसी डीन प्रा. रमाकांत चौधरी, पॉलिटेक्निकचे उपप्राचार्य प्रा. संदीप खाचणे व ॲडमिनिस्ट्रेटिव्ह युगेश खर्चे यांनी विशेष परिश्रम घेतले.

याप्रसंगी उपस्थित उद्योजकांनी आणि मान्यवरांनी माजी विद्यार्थ्यांना उद्योजकता व कॉर्पोरेट क्षेत्रातील नवनवीन संधींविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थ्यांनीही आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत महाविद्यालयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा. सदाशिव लवंगे यांनी आपल्या खास शैलीत केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी विभाग प्रमुख प्रा. जयप्रकाश सोनोने, प्रा. साकेत पाटील, प्रा. सुदेश फरपट, प्रा. अंकुश नारखेडे, प्रा.पांडुरंग चोपडे, प्रा. मनोज वानखडे, प्रा. अमोल हळदे, प्रा. राजेश सरोदे, प्रा. मनिष आचेलिया, प्रा. पराग चोपडे आणि प्राध्यापिका शुभांगी निवाणे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक प्रा. डी. पी. खरात यांनी सर्वांचे आभार मानले. सकाळी ८:१५ वाजता नोंदणी व उद्घाटनाने सुरू झालेला हा सोहळा दुपारपर्यंत आठवणींचा गंध आणि भविष्यातील नात्यांची घट्ट वीण अधिक मजबूत करत आनंदात संपन्न झाला.

# खामगांव अर्बन बँकेस राष्ट्रीयस्तरावरील 'बेस्ट आयटी रिस्क मॅनेजमेंट' पुरस्कार प्राप्त

प्रतिनिधी २० मे




**खामगाव :** सहकार क्षेत्रात अग्रगण्य व जनसामान्यांची बँक म्हणून नावलौकीक असलेल्या खामगांव अर्बन को-ऑप. मल्टीस्टेट शेडयुल्ड बँकेस यावर्षातही पुरस्कार प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र अर्बन बँक्स् फेडरेशन मुंबई व क्रेष्ट इन्फोमिडीया यांच्यातर्फे दि.९ मे २०२६ रोजी हॉटेल दि वेस्टीन कोरेगांव पार्क, पूणे येथे आयोजीत केलेल्या १० व्या अखिल भारतीय अर्बन को-ऑप. बँक संमेलनामध्ये क्रेष्ट इन्फोमिडीयाचे सीईओ गौतम नविन व सिंगटेक ॲन्ड ग्रुप ऑफ कंपनीचे सीईओ व कार्यकारी संचालक सुजित सिंग यांच्या हस्ते नागरी सहकारी बँक टायर ३ गटातून खामगांव अर्बन को-ऑप. बँकेस 'बेस्ट आयटी रिस्क मॅनेजमेंट' या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. बँकेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ज्ञानेश्वरजी जाधव यांनी सदर पुरस्कार स्विकारुन मार्गदर्शनपर संमेलनास संबोधित केले. खामगांव अर्बन बैंक नेहमीच ग्राहकांना सुविधा देण्याकरीता आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करीत नवकल्पना आणि अत्याधुनिक प्रगतीशिल बँकींग सेवा देत आहे व यापुढेही अधिकाधिक तंत्रज्ञानयुक्त तत्पर व सुरक्षित सेवा देण्याचा मानस आहे. बँकेचे स्वतःचे जागेत अकरा शाखेर्तॅऊश कार्यरत असून, यापासून स्थानिक ग्राहकांना व इतर बँकांच्यॅऊश धारकांना सदैव कॅश उपलब्ध करण्यात येऊन सेवा देत असते. त्याचप्रमाणे बँकेच्या ग्राहकांना नविन तंत्रज्ञानाचा वापर करीत चला डिजीटल होऊ या या ब्रिद वाक्यासह Franking, IMPS सुविधा, RTGS-NEFT, Toll Free Banking, Mobile Bankin, SMS Alert ke UPI सुविधा देणारी सहकार क्षेत्रातील अग्रणी बँक आहे. तर पर्सनल चेक बुक फेंसिलीटीचे बँकेतच प्रिंट करून खातेदारास चेक वितरीत करण्यात येते. बँकेच्या या प्रगतीमध्ये सभासद, ठेवीदार, खातेदार, हितचिंतक, मार्गदर्शक, संचालक मंडल, व्यवस्थापन मंडळ व कर्मचारी वर्ग यांचा मोलाचा वाटा असून बँकेच्या प्रगतीसाठी अध्यक्ष प्रा. डॉ. विजयजी पुंडे, उपाध्यक्ष डॉ. सतिषजी कुळकर्णी, मुख्य 'कार्यकारी अधिकारी श्री. ज्ञानेश्वरजी जाधव तसेच संचालक मंडळ व व्यवस्थापन मंडळ प्रयत्नशील आहेत. खामगांव अर्बन बँकेस राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले ही खामगांव अर्बन बँक परिवारासाठी हि अत्यंत अभिमानाची बाब असल्याचे बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. विजयजी पुंडे यांनी सांगीतले. बँकेला राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच. ३१ मार्च २०२६ आर्थिक वर्षअखेरीस मा. संचालक मंडळ व मा. व्यवस्थापन मंडळ यांच्या मार्गदर्शनात बँकेने रु. २१०० कोटी व्यवसायाचा टप्पा पार केल्याबद्दल सभासद, ग्राहक, संचालक मंडळ, व्यवस्थापन मंडळ व कर्मचारी वर्गात आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
बुधवार, दि. २० मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अकोल्यात 27 प्रकारचा बेकायदेशीर खतांचा साठा जप्त

प्रतिनिधी २० मे

**अकोला :** 'एमआयडीसी'मधील एका गोदामात कृषी विभागाच्या भरारी पथकाने मोठी कारवाई केली आहे. या ठिकाणी पिके वाढीसाठी वापरल्या जाणाऱ्या विनापरवाना २७ प्रकारचा खतांचा साठा (जैव उत्प्रेरक) जप्त केला आहे.. साधारणता १ कोटींच्या घरात हा खतांचा साठा लिटर आणि किलो प्रमाणात जप्त करण्यात आला आहे.. या कारवाईमुळे शहरात खतांचा काळाबाजार करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे





१ कोटींचा खतांचा साठा लिटर आणि किलो प्रमाणात जप्त..
एमआयडीसी'तील गोदामात कृषी विभागाच्या भरारी पथकाकडून कारवाई...
२७ प्रकारचे जैव उत्प्रेरक (खते) जप्त...

विनापरवाना जैव उत्तेजक विक्री व साठवणूक केली असल्याची माहिती अकोला कृषी विकास अधिकारी तुषार जाधव यांना मिळाली होती. त्यानंतर या ठिकाणी कृषी पथकाने छापेमारी केली. ॲग्रोटोनिक एशियन इंडस्ट्रीजच्या कंपनीत ही कारवाई करण्यात आली आहे.. यामध्ये एकूण २७ प्रकारचे जैव उत्प्रेरक (खते) ज्यामध्ये ३८२७ लिटर आणि ३१,१४१ किलो असा एकत्रित ९२ लाख ५ हजारांवर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे... अत्यावश्यक वस्तू अधिनियम आणि खत नियंत्रण आदेशानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात या प्रकरणात गुन्हा दाखल झाला आहे.

या खतांचे काही नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले असून तपासणी अहवालानंतर या खतांबद्दल कॉलिटी किती होती? हे स्पष्ट होणार आहे.. ॲग्रोटोनिक एशियन इंडस्ट्रीजच्य कंपनीचे वेगवेगळ्या २७ प्रकारचे जैव उत्प्रेरक उत्पादणे (P.G.R.) गोदामामध्ये साठवलेले आढळून आले.

येथे संबंधित व्यक्तींना ठेवलेल्या उत्पादनाबाबत परवाना प्रत तसेच करारनामा मागीतला असता सदर कंपनीचा परवाना तसेच करारनामा नसल्याचे सांगण्यात आले आहे..त्यामुळं विनापरवाना अवैधपणे खतांचा साठा जप्त केला आहे.

# आयुष्याच्या 'अंतिम निरोपा'च्या वेळीही कुटुंबीयांची लूट



प्रतिनिधी २० मे

**अकोला :** शहरातील शासकीय रुग्णालय असो किंवा खाजगी रुग्णालय दररोज कितीतरी रुग्ण दगावतात. अनेक रुग्ण बाहेर गावाहून आलेले असतात. औषधोपचारातच त्यांचा एवढा खर्च होतो की रुग्ण दगावल्यानंतर त्यांच्या परिवाराकडे घरी घेऊन जाण्यासाठी पैसे सुद्धा शिल्लक नसतात. परंतु या उपरही रुग्णांचे मृतदेह घरापर्यंत पोहोचविण्यासाठी खाजगी रुग्णवाहिका चालक मनमानी पद्धतीने भाडे वसूल करीत आहेत. कारण मृतदेह वाहून नेण्यासाठी कोणताही निश्चित दर नाही आणि तो मनमानी आहे.

सर्वच रुग्णालयांमध्ये येणारे रुग्ण गरीब आणि गरजू कुटुंबांतील असतात. जेव्हा येथे कोणाचा मृत्यू होतो, तेव्हा त्यांना सर्वात आधी मृतदेह वाहून नेण्याची समस्या भेडसावते. जेव्हा रुग्णवाहिका चालकांना किंवा ऑपरेटर्सना विचारले जाते, तेव्हा प्रत्येकजण वेगवेगळे दर सांगतो. यावर कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे,

## मृत्यूतही दया नाही

◆ काही मोजकेच प्रामाणिक रुग्णवाहिका सेवा पुरवणारे प्रति किलोमीटर सरासरी १२ ते १५ रुपये आकारतात. २०० किलोमीटरच्या प्रवासासाठी ते जास्तीत जास्त ४,००० रुपये घेतात. दरम्यान, या खंडणीच्या धंद्यात गुंतलेले लोक गरीब कुटुंबांकडून अवाजवी भाडे आकारतात. हे लोक नेहमीच जास्त रक्कम उकळण्याच्या प्रयत्नात असतात. दररोज एक गरीब कुटुंब त्यांचे बळी ठरते. मृतदेह वाहून नेण्याचे दर निश्चित नसल्यामुळे आणि त्यावर कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे, ते मनमानीपणे वागतात.

## कर्मचारीच सुचवतात रुग्णवाहिका चालकांची नावे

रुग्णाचा मृत्यू होताच रुग्णवाहिका चालकांचे खरे स्वरूप उघड होते. वेगवेगळे रुग्णवाहिका चालक एकाच गावासाठी वेगवेगळे भाडे सांगतात. दुःखात बुडालेल्या तसेच मरण पावलेल्यांच्या कुटुंबीयांना ही लूटमार सहन करण्यास भाग पाडले जाते, कारण मृतदेहाला सन्मानपूर्वक घरी नेल्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्याय नसतो. सर्वच रुग्णालयातील ५०इमृत व्यक्ती शहराबाहेरील असतात. निम्मे रुग्णवाहिका चालक आणि ऑपरेटर प्रामाणिकपणे काम करतात. तर उरलेल्या दुसऱ्या चालक आणि ऑपरेटरच्या मनमानीमुळे समस्या निर्माण होते. असे म्हटले जाते की, सरकारी रुग्णालयांमधील काही कर्मचारी मृताच्या नातेवाईकांना रुग्णवाहिका चालकांची नावे आणि क्रमांक देतात. यातून ते कमिशन कमावतात. चालक आधी नातेवाईकांना मृत्यूचे कारण विचारतात आणि त्यानंतरच दर सांगतात. जर मृत्यू सामान्य आजारामुळे झाला असेल, तर नेहमीचा दर सांगितला जातो. जर मृत्यू एचआयव्ही किंवा कर्करोगामुळे झाला असेल, तर दरात दीडपट वाढ होते. अनेकदा, जेव्हा वाटाघाटी करण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा चालक दादागिरीचा अवलंब करतात.

# न्यू तापडिया नगरमध्ये नाल्यासाठी रस्ता खोदून ठेवला

**तीन आठवड्यांपासून नागरिकांची गैरसोय**

प्रतिनिधी २० मे

**अकोला :** शहरातील न्यू तापडिया नगर परिसरात नाल्याच्या कामासाठी रस्ता खोदून ठेवण्यात आला असून गेल्या तीन आठवड्यांपासून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. दुबेवाडी परिसरातून तापडिया नगरकडे येणारा हा प्रमुख मार्ग असल्याने फोर व्हीलर, थ्री व्हीलर तसेच दुचाकी वाहनचालकांची मोठी गैरसोय होत आहे. रस्ता खोदून काम रखडल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. न्यू तापडिया नगर परिसरात नाल्याच्या कामासाठी रस्ता खोदण्यात आला आहे. मात्र गेल्या तीन आठवड्यांपासून



हा रस्ता दुरुस्तीविना तसाच उघडा पडला असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.दुबेवाडी परिसरातून तापडिया नगरमध्ये येणारा हा महत्त्वाचा मार्ग असून या रस्त्यावरून दररोज फोर व्हीलर, थ्री व्हीलर तसेच दुचाकी वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. रस्ता खोदून ठेवल्यामुळे वाहतुकीवर परिणाम होत असून वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत आहे. रस्त्यावर माती आणि खड्डे असल्याने अपघाताचा धोका वाढला असून स्थानिक नागरिकांनी प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.संबंधित विभागाने तातडीने काम पूर्ण करून रस्ता पूर्ववत करावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग व शिवीगाळ प्रकरणी दोघांवर गुन्हा

प्रतिनिधी २० मे

**मंगरूळपीर :** अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून शिवीगाळ केल्याप्रकरणी आसेगाव पोलिसांनी दोन जणांवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार एका १४ वर्षीय मुलीने तक्रार दाखल केली की, दि.१७ रोजी सकाळी मी व माझी आई असे आम्ही आमचे शेतात काडी कचरा वेचण्या करिता गेलो तर माझे शेताला लागुन असलेल्या शेतात ओंकार मदन चव्हाण व त्यांचा मुलगा मंथन ओंकार चव्हाण रा.चिखलागड हे त्याचे शेतात काम करत होते. आमचे शेताचा ओंकार मदन चव्हाण याने धुरा फोडल्याचे माझ्या आईला दिसले म्हणून माझ्या आई ने ओंकार चव्हाण यास म्हटले की तुम्ही आमचे शेताचा धुरा का फोडला तर ओंकार चव्हाण म्हणाला की तो धुरा आमचा आहे असे म्हणुन माझे आई ला ओंकार मदन चव्हाण याने शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली व अंगावर धावुन आला. मी माझ्या आई जवळ उभी असतांना त्याच ठिकाणी उभा असलेला मंथन ओंकार चव्हाण हा माझ्या जवड आला व त्याने माझा उजवा हात धरला व विनयभंग केला.मी जोरात कला केला व माझी आई धावत आली तर मंथन ओंकार चव्हाण हा बाजूला सरकला व मला व माझे आईला शिवीगाळ करत होता.अशा तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# बिर्ला गेट क्रमांक 2 परिसरातील डीपीला आग

प्रतिनिधी २० मे

**अकोला :** शहरातील बिर्ला गेट क्रमांक २ परिसरात डीपीमध्ये अचानक बिघाड होऊन वायरिंग जळाल्याची घटना घडली. बुधवारी सकाळी आठ वाजताच्या सुमारास ही घटना घडली असून हरिहर अपार्टमेंटसह संपूर्ण परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला. अचानक वीज गेल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली असून महावितरण विभागाकडून दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. शहरातील बिर्ला गेट क्रमांक २ परिसरात बसविण्यात आलेल्या डीपीमध्ये सकाळी अचानक बिघाड झाला. सकाळी आठ वाजताच्या सुमारास डीपीमधील वायरिंगमध्ये शॉर्टसर्किट होऊन वायरिंग जळून खाक झाल्याची घटना घडली.या घटनेनंतर हरिहर

◆ हरिहर अपार्टमेंट परिसरातील नागरिकांची गैरसोय




अपार्टमेंटसह परिसरातील संपूर्ण वीज लाईन बंद पडली. अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली. घरगुती कामांसह व्यावसायिक व्यवहारांवरही याचा परिणाम झाल्याचे नागरिकांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच महावितरण विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. दरम्यान, वारंवार होणाऱ्या तांत्रिक बिघाडामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली असून वीज यंत्रणेची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात येत आहे.


# जिल्हाधिकाऱ्यांकडून मान्सूनपूर्व तयारीचा आढावा

प्रतिनिधी २० मे

**अकोला :** जिल्ह्यात नालेसफाई, नादुरुस्त पूल, रस्ते, प्रकल्पांची दुरूस्ती आदी मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करावी. धोकादायक इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून नोटीसा द्याव्यात. त्याचप्रमाणे, तहसील स्तरावरील, तसेच आरोग्य, नगरपालिका, महापालिका, साबांवि, पाटबंधारे आदी विभागांचे नियंत्रण कक्ष १ जूनपासून सुरू करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत झाली, या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे व विविध यंत्रणाप्रमुख उपस्थित होते.

◆ १ जूनपासून नियंत्रण कक्ष कार्यान्वित



जिल्हाधिकारी वर्षा मीना म्हणाल्या की, शहरातील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून धोकादायक इमारतींबाबत संबंधितांना सूचना द्यावी. दूषित पाण्यासंदर्भात तपासण्या वाढवा. जिल्ह्यात ५३ महसूल मंडळ स्तरावर रेनगेज व ॲटोमॅटिक वेदर स्टेशन यंत्रणा कार्यान्वित आहे. या यंत्रणेची तपासणी व आवश्यक तिथे दुरूस्ती करून घ्यावी. अकोला जिल्ह्यात पूर्णा, मोर्णा, काटेपूर्णा, पठार, वान, गौतमा, मन, मस, विश्वमित्रा, उमा, पेढी, निर्गुणा, खाईनदी, विद्रुपा नद्या वाहतात. तसेच, ८३ पूरबाधित गावे आहेत. वारंवार आपत्कालीन घटना झालेली १० ठिकाणे आहेत. अशा ठिकाणी वेळीच सूचना देण्यासाठी फलक, संदेशवहन यंत्रणा, नियंत्रण कक्ष आदी व्यवस्था व्हावी. आवश्यक तिथे निवा-यांची सोय, तसेच सर्व प्रकल्पांची दुरूस्ती करावी, बिनतारी यंत्रणा स्थापित करावी, असे निर्देश त्यांनी दिले. त्या पुढे म्हणाल्या की, पावसाळा लक्षात घेता धोकादायक होर्डिंग्ज, जीर्ण झाडे काढावीत. जिल्हा व तहसील स्तरावरील शोध व बचाव पथकाचे प्रशिक्षण पूर्ण करावे. त्यांना आवश्यक लाईफ जॅकेट, रिंग, रोप, बोट, इमर्जन्सी लाईट आदी साहित्य उपलब्ध करून घ्यावे. शहरातील नालेसफाई, नदीनाल्याच्या प्रवाहातील अडथळे दूर करावेत. पावसाळ्यात अस्वच्छतेमुळे रोगराई पसरण्याची शक्यता असते. त्यामुळे स्वच्छता कामे पूर्ण करावीत, तसेच आरोग्य केंद्रे, पथके सज्ज ठेवावीत. महावितरणकडून वीज वाहिन्यांजवळील धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी, खांब कोसळल्यास वेळीच उपाय योजनेसाठी यंत्रणा आदी कामे पूर्ण करून वीजपुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी. असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.

# विद्युत खांबावरून पडल्याने कर्मचाऱ्याचा मृत्यू

प्रतिनिधी २० मे

**बार्शीटाकळी :** महान येथील महावितरणचे बाहयस्त्रोत तंत्रज्ञ कर्मचारी दीपक सेवकराम ठाकरे ३४, हे हातोला गावात विजेचे काम करत असतांना विद्युत खांबावरून खाली पडल्याने त्यांचा अपघातात मृत्यू झाल्याची घटना १९ मे रोजी सकाळी घडली. दीपक ठाकरे हे महान जवळील हातोला गावात एलटी लाईनवर १९ मे ला सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास काम करत होते. यावेळी विद्युत पोलवरून खाली पडून अपघात झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. संध्याकाळी सात वाजताचे सुमारास खोपडी गावात त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# आठवडा उलटूनही बुलडाणा, वाशिममध्ये पेट्रोल-डिझेलचा ठणठणाट!

प्रतिनिधी २० मे

**अकोला :** अस्मानी संकटामुळे राज्यातील शेतकरी आधीच कर्जात बुडालेला आहे. निसर्गाच्या लहरीपणानं आधीच हैराण झालेला बळीराजा आता पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या नव्या संकटामुळे पुरता हतबल झाला आहे. बुलडाणा, वाशिम जिल्ह्यातील अनेक भागात डिझेल मिळत नसल्यानं ट्रॅक्टर बंद पडलेत. ज्याच्याकडे डिझेल इंजिननं पाणीउपसा होतो त्यांना आता पिकांना पाणी देता येत नाहीये. तर शेतमाल बाजारात नेण्यासाठीही शेतकऱ्यांची फरफट सुरू आहे. सरकारच्या नियोजनाच्या अभावाचा सर्वात मोठा फटका पुन्हा एकदा बळीराजालाच बसतोय. अनेक जिल्ह्यातील पेट्रोल पंपावर सध्या इंधन टंचाईच भयावह वास्तव समोर आलं असून आता नागरिकांच्या संतापाचाही कडेलोट होण्याची शक्यता आहे. बुलढाणा जिल्ह्यात आज (२० मे) सातव्या दिवशीही इंधन टंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत. जिल्ह्यातील १६६ पेट्रोल पंपांपैकी निम्म्याहून अधिक पेट्रोल पंपावर डिझेल उपलब्ध नसल्याने शेतकरी ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीच्या



◆ इंधन टंचाईचे भीषण वास्तव

मशागतीची कामे करू शकत नसल्याचे चित्र आहे. इंधन टंचाईमुळे रस्ते वाहतुकीवरही परिणाम झाला असून जवळपास पंधरा ते वीस टक्के रस्ते वाहतूक कमी झाल्याचं समोर येत आहे. जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर रात्रभर शेतकरी व वाहनधारकांच्या रांगा बघायला मिळाल्या. मात्र बुलढाणा जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा असून साठेबाजीमुळे इंधन टंचाई निर्माण झाल्याचा प्रशासनाचा दावा आहे. तर भाव वाढ होऊनही वीस ते पंचवीस टक्के इंधन विक्री वाढल्याचं प्रशासनाने म्हटले आहे. तसेच वाशिममध्ये सलग सहाव्या दिवशी डीझल मिळत नसल्याचे चित्र आहे. डीझल नाही असे फलक लागल्याने शेतकऱ्यांना आणि वाहनचालकांना रिकाम्या हातांनी परतण्याची वेळ येत आहे.

# जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटची शिष्यवृत्ती परीक्षेत गगनभरारी

प्रतिनिधी २० मे

**आलेगाव :** येथील साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटने इयत्ता पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही शाळेने उत्कृष्ठ निकालाची आपली गौरवशाली परंपरा कायम राखली असून, मोठ्या संख्येने विद्यार्थी या परीक्षेत पात्र ठरले आहेत. शाळेच्या निकालाची आकडेवारी पाहता, दोन्ही इयत्तांमध्ये विद्यार्थ्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली आहे: इयत्ता पाचवी: एकूण ३१ विद्यार्थ्यांपैकी ३० विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. इयत्ता आठवी: एकूण ३६ विद्यार्थ्यांपैकी ३४ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशामध्ये शाळेचे आधारवड व प्रेरणास्थान सुभाष जैन आणि अध्यक्ष अक्षय जैन यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच पातूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रवीण डाबेराव, विस्तार अधिकारी आणि आलेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख निवास चव्हाण यांचे वेळोवेळी लाभलेले मार्गदर्शन या यशासाठी महत्त्वपूर्ण ठरले. शाळेचे मुख्याध्यापक महावीर जैन यांच्या नेतृत्वात सर्व शिक्षकांच्या मेहनतीला यश आले.

# दिव्यांग व्यक्तींना प्राधान्याने व सवलतीने शासकीय जमीन उपलब्ध करून द्या- निवेदनाद्वारे मागणी

प्रतिनिधी २० मे

**अकोला :** दिव्यांग व्यक्तींना प्राधान्याने तसेच सवलतीच्या दरात २०० चौरस फूट जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी केली. २०१६ च्या जीआर नुसार अद्याप एकाही दिव्यांग व्यक्तीला जागा दिलेली नाही. आमची मागणी मान्य झाली नाही तर आंदोलन करावे लागेल असा इशारा आज दिला.

जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्तांना निवेदन दिले. तसेच आमच्या मागण्या संदर्भात दिव्यांग व्यक्तींना तिसऱ्या मजल्यावर जाऊन



सतत येरझारा कराव्या लागतात. अशी वेळ येऊ नये अशी मागणी प्रशासनाकडे केली.

जिल्हाधिकारी यांनी या विषयात लक्ष घालावे. तसेच समितीची या संदर्भात बैठक झाली नाही. त्यामुळे समस्या रेंगाळणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

# खून प्रकरणी तीन आरोपींचा जमानत अर्ज फेटाळला

प्रतिनिधी २० मे

**अकोट :** शहरात दिवसाढवळ्या तरूणाचा खून करणाऱ्या १६ आरोपींच्या टोळक्यापैकी आरोपी राम अंभोरे, गजानन अंभोरे व विजय शिवरकर या तिन्ही आरोपींचा जमानत अर्ज अकोट न्यायालयाचे जिल्हा व सत्र न्यायाधिश बी.एम. पाटील यांनी १९ मे रोजी फेटाळून लावला. या तीनही आरोपींनी इतर आरोपींच्या मदतीने सामूहिकरित्या लोखंडी पाईप, चाकू, दगड व विटांनी जबर मारहाण करून लखन अंभोरे याचा खून केल्याच्या प्रकरणात दाखल केलेला जमानत अर्ज न्यायालयाने नामंजूर केला. आरोपी १६/३/२०२६ पासून अकोला कारागृहात आहेत. सरकारी वकील अजित देशमुख यांनी जमानत अर्जाला विरोध करतांना न्यायालयात लेखी उत्तर व युक्तीवाद सादर केला. या प्रकरणात मृतकाच्या पत्नीने शहर पोलिसात फिर्याद दिली होती. या गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला नसून सहा. पोलिस निरिक्षक शमुवेल वानखडे हे तपास करीत आहेत. जामीन दिल्यास आरोपी साक्षिदारांवर दबाव निर्माण करून तपासामध्ये अडथळा निर्माण करू शकतात. त्यामुळे तीनही आरोपींचा जमानत अर्ज नामंजूर करण्यात यावा, असा युक्तीवाद सरकारी वकील अजित देशमुख यांनी न्यायालयात केला. सरकार पक्षाला ॲड. एस.एन. ठोकळ व ॲड.एस.ए. वैराळे यांनी सहकार्य केले. दोन्ही पक्षांच्या युक्तीवादानंतर न्यायालयाने आरोपींचा जमानत अर्ज नामंजूर केला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK